सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

Scan this QR code using the WhatsApp camera to join this group
क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❏ वर्ष - ३ रे ❏ अंक - १७७ वा ❏ अमरावती (महाराष्ट्र) ❏ शुक्रवार दि. ८ ऑगस्ट २०२५ ❏ संपादक - शुभांगी जोशी ❏ मुल्य - १ रु. ❏ पृष्ठ -६

## ट्रम्प यांनी टॅरिफ वाढवताच मोदी सरकारचा मोठा निर्णय

### ३.६ अब्ज डॉलर्सच्या कराराला दिली स्थगिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८नवी दिल्ली**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर टॅरिफ वाढविण्याचा सपाटा लावला आहे. आधी २५ टक्के टॅरिफ लादल्यानंतर आठवड्याभरातच त्यांनी यात २५ टक्क्यांची आणखी वाढ केली. यानंतर व्यापार जगतात एकच खळबळ उडाली. यानंतर भारताने मात्र सावध भूमिका घेतल्याचे दिसले. आता भारताच्या वतीने मोठा निर्णय घेण्यात आला आहे. अमेरिकेकडून बोईंग जेट विमान खरेदीच्या ३.६ अब्ज डॉलर्सच्या



कराराला स्थगिती देण्यात आली असल्याची माहिती मिळत आहे.

२०२१ मध्ये सहा बोईंग पी-८आय सागरी गस्त विमानासाठींचा मूळ करार २.४२ अब्ज डॉलर्सला मंजूर करण्यात आला होता. मात्र महागाई, पुरवठा साखळीत आलेले व्यत्यय आणि ट्रम्प यांनी लादलेल्या शुल्कामुळे गेल्या काही वर्षात या करारात वाढ झाली.

फायनान्शियल एक्सप्रेसने संरक्षण सूत्रांच्या हवाल्याने दिलेल्या वृत्तानुसार, या प्रकल्पात जवळपास ५० टक्क्यांची वाढ झाल्यामुळे करार स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीला ट्रम्प यांनी २५ टक्के टॅरिफ लादल्यानंतर विमान खरेदीची किंमत वाढली.बोईंग खरेदीचा खर्च भरमसाठ वाढल्यामुळे संरक्षण मंत्रालयाने या खरेदीला स्थगिती दिली असून धोरणात्मक पुनर्मूल्यांकन करण्याचा निर्णय घेतला आहे. विमानाच्या सुट्या भागाच्या वाढत्या किमती, वेगाने बदलत असलेली भू-राजकीय परिस्थिती, स्वायत्तता यासारख्या घटकांचा परिणाम म्हणून करार स्थगित करण्यात आला आहे.

## अपरहणाचा मास्टरमाईंड म्हणणाऱ्या पडळकरांना रोहित पवारांचं प्रत्युत्तर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांच्या कार्यकर्त्याचे अपहरण करून त्याला जीव मारण्याचा प्रयत्न करण्यात आल्याची घटना घडली. या घटनेवरून आता राजकारण चांगलेच तापले आहे. कार्यकर्त्याच्या अपहरणामागचा मास्टरमाईंड रोहित पवार असल्याचा गंभीर आरोप गोपीचंद पडळकर यांनी केला आहे. ज्यांनी कार्यकर्त्याचे अपरहण केलं होतं त्या तरुणांना रोहित पवारांचा व्हिडीओ कॉल आला होता आणि त्यांनी माफी मागायला लावली, असा देखील आरोप पडळकर यांनी केला होता. गोपीचंद पडळकर यांच्या या गंभीर आरोपाला रोहित पवार यांनी प्रत्युत्तर दिलं आहे.



रोहित पवार यांनी पडळकरांना उत्तर देताना सरकारवर जोरदार टीका केली. ते म्हणाले की, 'मी फक्त सरकारच्या विरोधात बोलतोय. सरकारमध्ये असलेल्या सर्व मंत्र्यांचे काळे कारनामे मी लोकांसमोर आणत आहे. आज सरकारच्या विरोधात बोलणारी अनेक लोकं आहेत आणि त्यातला मी एक आहे. माझ्यावर कुठे तरी कारवाई करायची आणि माझा आवज दाबण्याचा प्रयत्न करण्यासाठी हे प्रकरण पुढे आणले आहे. पण तुम्ही कितीही प्रयत्न केले तरी आम्ही काही शांत बसणार नाही. एसआयटी स्थापन करा. जे काय खरं ते समोर येईल अशी आमची देखील भूमिका आहे.'

दरम्यान, सोलापुरमध्ये गोपीचंद पडळकर यांच्या कार्यकर्त्याचे अपहरण करत त्याला मारण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. याचा व्हिडीओ देखील समोर आला आहे. काही महिन्यांपूर्वी झालेल्या मारहाणीचा बदला घेण्यासाठी त्याचे अपहरण करुन हत्या करण्याचा प्रयत्न करण्यात आला. शरणु हांडे असे अपहरण झालेल्या गोपीचंद पडळकर यांच्या समर्थकाचे नाव आहे. अमित सुरवसे या तरुणाने आपल्या साथीदारांच्या मदतीने त्याचे अपहरण केले होते. या प्रकरणी पोलिसांनी अमित सुरवसेसह ६ जणांविरोधात गुन्हा दाखल केला. या आरोपींना पोलिसांनी अटक केली. आरोपींनी केलेल्या मारहाणीत शरणु हांडे गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

## तिकडे उद्धव ठाकरे दिल्लीत, इथे नाराज पदाधिकाऱ्यांचे राजीनामे

### ठाकरे गटात बाहेरच्यांची लुडबुड?



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८मुंबई**

उपराष्ट्रपतीपदाची निवडणूनक आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे वारे वाहू लागले असताना महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा शिंदेसेनेचे प्रमुख एकनाथ शिंदे आणि उद्धवसेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे दिल्लीत आल्याने देशाच्या राजधानीत आणि महाराष्ट्रात चर्चांना उधाण आले होते. दोन्ही नेते दिल्लीत तीन दिवस तळ ठोकून बसणार आहेत. उद्धव ठाकरे यांनी शरद पवारांच्या निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेतली. यानंतर उद्धव ठाकरे राहुल गांधी यांच्या निवासस्थानी स्नेहभोजनाला उपस्थिती लावली. परंतु, यावेळी उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, संजय राऊत यांना शेवटच्या रांगेत बसवल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. यातच उद्धव ठाकरे दिल्ली दौऱ्यावर असताना इथे महाराष्ट्रात ठाकरे गटात आलबेल नसल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

एकीकडे उद्धव ठाकरे गटाला राज्यभरातून खिंडार पडत असल्याचे दिसत आहे. पक्षाला लागलेली गळती थांबताना दिसत नाही. यातच ठाकरे बंधू एकत्र येण्याच्या चर्चांनी जोर धरला आहे. त्यामुळे मनसे आणि ठाकरे गटात नवचैतन्य आल्याचे पाहायला मिळत आहे. असे असले तरी ठाकरे गटाला लागलेली गळती आणि पक्षांतर्गत वाढत चाललेली नाराजी कमी होताना दिसत नाही. एकामागून एक पदाधिकारी, नेते, माजी नगरसेवक, कार्यकर्ते महायुतीत सामील होत आहेत. यातच उद्धवसेनेत बाहेरच्यांची लुडबुड होत असल्याचा दावा पक्षातीलच काही जण करत असल्याचे म्हटले जात आहे.

## उद्धव ठाकरे दिल्लीत आणि सुप्रिया सुळेंनी घेतली पंतप्रधान मोदींची भेट! कारण काय?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८ नवी दिल्ली**

माजी मुख्यमंत्री आणि महाविकास आघाडीतील महत्त्वाचे नेते उद्धव ठाकरे गुरुवारी (७ ऑगस्ट) दिल्लीत होते. त्याचदिवशी ठकरेंचा सहकारी पक्ष असलेल्या शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. या भेटीची जोरदार चर्चा सध्या दिल्लीच्या वर्तुळात सुरु आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे देखील दोन दिवस दिल्ली दौऱ्यावर होते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची संपूर्ण कुटुंबीयांसमोर शिंदेंनी भेट घेतली तसेच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची सर्व खासदारांसमोर भेट घेतली या



भेटीदरम्यान वेगळी चर्चा शिंदेंनी करत राज्यातली अस्वस्थता बोलून दाखवल्याचं समजतं या घडामोडी घडत असतानाच उद्धव बाळासाहेब ठाकरे हे देखील दिल्ली दौऱ्यावर होते ठाकरे यांनी दिल्लीत पत्रकार परिषद घेत केंद्र सरकारवर जोरदार प्रहार केला.

उद्धव ठाकरे सरकारवर टीका करत होते तर दुसरीकडे सुप्रिया सुळे पंतप्रधान नरेंद्र मोदींची भेट घेत आहेत यामुळे नेमकी अचूक वेळ सुप्रिया सुळेंनी सादली का अशी चर्चा रंगली दिल्लीमध्ये इंडिया आघाडीची बैठक राहुल गांधी यांच्याकडे होत असतानाच सुप्रिया सुळे यांनी दुपारी पंतप्रधान नरेंद्र मोदींची भेट घेत नेमका काय सूचक इशारा केलाय याची चर्चा आहे.

शरद पवार यांनी अनेकदा मोदी सरकारला सहकार्याची भूमिका घेतल्या आहेत. त्याचबरोबर सुप्रिया सुळे यांनी पहलगाम हल्ल्यानंतर केंद्र सरकारला पाठिंब्याची भाषा वेळोवेळी केली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरेंच्या दिल्ली वारीदरम्यान सुप्रीया सुळे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींची भेट घेतल्याने इंडिया गाडी मधील अनेक नेत्यांच्या पोटात गोळा आला आहे. राज्यात कुठंही एकत्र लढताना न दिसणाऱ्या महाविकास आघाडीचा अस्तित्व खरंच पुढे किती दिवस राहील याविषयी नव्यानं तर्कवितर्क सुरू झाले आहेत.

## ईडीचं दोष सिद्ध करण्याचं प्रमाण १० टक्क्यांपेक्षाही कमी : सुप्रीम कोर्ट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८नवी दिल्ली**

सर्वोच्च न्यायालयाने ईडीला कायद्याच्या चौकटीत राहून काम करण्याचा कडक इशारा दिलाय. शिवाय, बदमाशांसारखे वागू नका. भामटेपणा सोडा, असं म्हणत सुप्रीम कोर्टाने गुरुवारी (दि.७) ईडीला झाप झापलंय. न्यायमूर्ती सूर्यकांत, उज्जल भूयान आणि एन. कोटेश्वर सिंह यांच्या खंडपीठाने ही टिप्पणी केली. तीन न्यायमूर्तींच्या खंडपीठाने जुलै २०२२ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या पुनर्विचार याचिकांवर सुनावणी सुरु असताना हे निरीक्षण नोंदवलं आहे. या केसमध्ये मनी लाँड्रिंग प्रतिबंधक कायद्यान्वये (PMLA) ED ला अटक, झडती आणि जप्तीचे अधिकार मान्य करण्यात आले होते.

या पुनर्विचार याचिका ग्राह्य धरण्यायोग्य नाहीत, कारण यामध्ये प्रत्यक्षात आधीच्या निकालाविरुद्ध छुप्या पद्धतीने अपील करण्यात आलंय, असा युक्तीवाद केंद्र सरकार आणि एऊ तर्फे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल (ASG) एस. व्ही. राजू यांनी केला. या प्रकरणातील गुन्हेगार चौकशी लांबवण्यासाठी कायदेशीर प्रकियेचा वापर करत आहेत. न्यायालयात एकामागून एक अर्ज दाखल करतात आणि त्यामुळे एऊचे अधिकारी तपास करण्याऐवजी न्यायालयीन उपस्थितीवर वेळ घालवतात, असंही एस. व्ही. राजू न्यायालयात म्हणाले. त्यानंतर न्यायमूर्ती उज्जल भूयान यांनी ईडीचं दोष सिद्ध करण्याचं प्रमाण १० टक्क्यांपेक्षाही कमी असल्याचं सांगत ईडीला झापलं.

## अमरावतीत शिक्षण विभागातील सर्व अधिकारी सामूहिक रजेवर

### जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाला निवेदन – शैक्षणिक कामकाज ठप्प होण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

नागपूर विभागातील बोगस शालार्थ प्रकरणात अटकसत्र वाढत असल्याने अमरावती विभागातील शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर गट अ व ब कॅडरमधील अधिकारी व कर्मचारी यांनी ८ ऑगस्टपासून बेमुदत सामूहिक रजा आंदोलनाचा निर्णय घेतला आहे.



गेल्या काही महिन्यांपासून चर्चेत असलेल्या या प्रकरणात बोगस शिक्षकांना बनावट शालार्थ आयडी देवून वेतन अदा झाल्याचा आरोप आहे. प्राथमिक चौकशीत हे प्रकरण सायबर स्कॅम असल्याचे स्पष्ट झाले असून, मूळ गुन्हेगारांचा शोध घेऊन कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतन प्रक्रियेत अनेक टप्प्यांत कागदपत्रे तपासून मंजुरी दिली जाते. तरीही अटकसत्र सुरू राहिल्याने प्रशासनात असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.


या सामूहिक रजेमुळे शाळांच्या महत्त्वाच्या कामकाजासह विद्यार्थ्यांच्या लाभाच्या योजना ठप्प होण्याची शक्यता आहे. या निर्णयाबाबत जिल्हाधिकारी मार्फत शासनाला निवेदन पाठविण्यात आले असून, आंदोलनामुळे होणाऱ्या परिणामाची जबाबदारी संबंधित संघटनेने नाकारली आहे.निवेदनावेळी शिक्षण उपसंचालक निलिमा टाके-गुल्हाने, सचिव डॉ. जयश्री राऊत, शिक्षणाधिकारी प्रिया देशमुख, सतीश मुगल, वेतन पथक अधीक्षक सचिन गुल्हाने यांसह विभागातील अनेक अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## शरद पवार दिल्लीहून थेट नागपुरात

### उद्याला मंडल यात्रेला दाखविणार हिरवी झेंडी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८नागपूर**

नागपूर : राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) अध्यक्ष व खासदार शरद पवार शुक्रवारी (८ ऑगस्ट) दोन दिवसांच्या नागपूर दौऱ्यावर येत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे शनिवारी (९ ऑगस्ट) मंडल यात्रा काढण्यात येणार असून तिचा शुभारंभ त्यांच्या पवार



यांच्या हस्ते व्हेरायटी चौक, आशीर्वाद लॉन येथून होणार आहे.


विधानसभा निवडणुकीनंतर प्रथमच पवार यांचा हा नागपूर दौरा आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या दौऱ्याला महत्व आहे. शुक्रवारी सांयकाळी पवार यांचे दिल्लीहून नागपुरात आगमन होईल. त्यांचा मुक्का एका खासगी हॉटेलमध्ये आहे. ते स्नेहभोजनासाठी पक्षाचे माजी आमदार प्रकाश गजभिये यांचे निवासस्थानी जाणार आहे. त्यानंतर ९ ऑगस्टला सकाळी ९ वाजता मंडल यात्रेला हिरवी झेंडी दाखवतील, असे राष्ट्रवादीचे नेते अनिल देशमुख यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत सांगितले. विविध विकास कामे पूर्ण करून वर्ष दीड वर्ष झाले आहे. परंतु, अद्यापही कामचे देयक न मिळाल्याने राज्यातील कंत्राटदाराचे सुमारे ९० हजार कोटी रुपये देणे बाकी आहे. अनेक कंत्राटदार हे कर्जबाजी झाले आहे, असा दावा देशमुख यांनी केला.

## शालेय अभ्यासक्रमात आता वाहतूक सुरक्षेसह समाजसेवा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जीवनाविषयी आत्मियता निर्माण करण्याच्या दृष्टिने शालेय अभ्यासक्रमात आता वाहतूक सुरक्षा व नागरी संरक्षणासह समाजसेवा शिकवली जाणार आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने तयार केलेल्या शालेय शिक्षण अभ्यासक्रम (प्रस्तावित) मसुदा २०२५ मध्ये या दोन नवीन विषयांचा समावेश आहे. नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी ते लागू राहतील.



त्यामुळे वाहतूक सुरक्षेसह सामाजिक भान जोपासण्याचे धडे विद्यार्थ्यांना आता शाळेतूनच मिळतील.

शालेय शिक्षण ते उच्च शिक्षणापर्यंत सर्वांगीण सुधारणा करण्याच्या दृष्टिने राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० आखण्यात आले. त्यानुसार राज्यात इयत्ता तिसरी ते दहावीपर्यंत शालेय शिक्षण अभ्यासक्रमाचा प्रस्तावित मसुदा राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने तयार केला. या मसुद्यामध्ये एकूण २० विषय दिले आहेत. त्यात नव्यानेच वाहतूक सुरक्षा व नागरी संरक्षणा आणि समाजसेवा हे विषय घेण्यात आले. समाजसेवा विषयात सामाजिक घडामोडी, अभिरुची, आत्मविश्वास आणि सामाजिक समस्या ओळखण्याची क्षमता निर्माण करण्याच्या अर्थाने दैनंदिन जीवनाशी संबंधित अभ्यासक्रम राहणार आहे.

सुरक्षित, शिस्तबद्ध आणि सुजाण समाज घडविण्यास महत्त्वपूर्ण हातभार लागेल, असा विश्वास शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने व्यक्त केला.

या संपूर्ण मसुद्यावर २७ ऑगस्टपर्यंत शिक्षण तज्ज्ञ, पालक व नागरिकांना सूचना व अभिप्राय ऑनलाइन नोंदवता येणार आहेत.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवर बहिष्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८ पुणे**

निवडणुकांपूर्वी महायुतीने शेतकऱ्यांचे कर्ज माफ करू, अशी घोषणा केली होती. ती अद्यापही अमलात आणली नाही. शेतकऱ्यांनी यासाठी आंदोलन करू नये, यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. मात्र, शेतकरी विभागला जाऊ नये, यासाठी येत्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत प्रहार पक्ष बहिष्कार टाकेल, अशी घोषणा संघटनेचे अध्यक्ष व माजी आमदार बच्चू कडू यांनी केली. जात, धर्माच्या आधारावर तरुणांमध्ये फूट पाडली जाईल, मतांसाठी विरोध होईल, या कारणामुळेच या निवडणुका लढण्याची गरज नाही, असेही



त्यांनी स्पष्ट केले.डिसेंबर दरम्यान होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवर बहिष्कार घालण्याचा बच्चू कडू यांचा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे. पुण्यात झालेल्या शेतकरी हक्क परिषदेत या संदर्भात कडू यांनी घेतलेली भूमिका राजू शेट्टी यांनी मात्र पुढील बैठकीत विचार करूनच मांडू, असे स्पष्ट केले. मात्र, त्यावर कडू यांनी आपली वैयक्तिक भूमिका असल्याचे पत्रकार परिषदेत स्पष्ट केले.

## संपादकीय ......

# ट्रम्प यांची मनमानी

आर्थिक आघाडीवरील शांतता व सुव्यवस्था मोडीत काढावी, या हेतूनेच बेबंद वर्तन सध्या अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प करत आहेत. रशियाकडून तेल खरेदी करत असल्याबद्दल दंड म्हणून त्यांनी बुधवारी भारतावर २५ टक्के अतिरिक्त आयात शुल्क लादले. आधी जाहीर केलेले २५ टक्के शुल्क लागू होण्यास १४ तास बाकी असतानाच त्यांनी हा नवा आदेश काढला! या अतिरिक्त कराची अंमलबजावणी आदेश निघाल्यापासून तीन आठवड्यांनी केली जाणार आहे. भारत रशियाकडून तेल खरेदी करून एकप्रकारे युक्रेनविरोधात पुकारलेल्या युद्धाला मदत करत आहे, असा आरोप करत, २४ तासांत भारतावर भरमसाट आयात शुल्क लादण्याची धमकी ट्रम्प यांनी दिली होती. मी पोकळ धमक्या देत नाही, हे सिद्ध करण्यासाठी त्यांनी अतिरिक्त कराच्या आदेशावर स्वाक्षरीही केली. कोणत्याही देशावर कशाही पद्धतीने करांची कुर्हाड चालवणार्या ट्रम्प यांना आंतरराष्ट्रीय व्यापार म्हणजे पोरखेळ वाटतो की काय, अशी शंका वाटू लागली आहे! खरे तर, रशिया-युक्रेन युद्धात भारताने तटस्थ भूमिका घेतली. हे युद्ध लवकरात लवकर थांबावे, यासाठी मध्यस्थी करण्याची तयारीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दाखवली. अशावेळी भारत रशियाची कड घेत असल्याचा आरोप करणे मूर्खपणाचे आणि निराधार आहे. मुद्दामहून काहीतरी भांडण उकरून काढून, इप्सित साधण्याचा ट्रम्प यांचा इरादा दिसतो.नवीन आदेशानुसार, सवलत दिलेल्या काही वस्तू वगळता, भारतीय मालावर ५० टक्के यथामूल्य शुल्क लावले जाईल. आधी जाहीर केलेल्या २५ टक्के शुल्काची अंमलबजावणी गुरुवारपासून सुरू झालीच आहे. तर, बुधवारपासून २१ दिवसांनी अतिरिक्त २५ टक्के शुल्क लागू होणार आहे. म्हणजे आणखी तीन आठवड्यांनी भारतीय मालावर अमेरिकेत ५० टक्के शुल्क लागू होण्यास सुरुवात होईल आणि ते जगात सर्वाधिक असेल. अमेरिकेने सध्या केवळ ब्राझीलवर ५० टक्के आयात कर लावला आहे. एप्रिलमध्ये चीनवर १०४ टक्के शुल्क लावल्याचे जाहीर केले होते. चीनने अमेरिकन मालावर लावलेले वाढीव शुल्क कमी करण्याचा निर्णय घेतला नाही, तर अमेरिका चीनवर जादा कर लावेल, अशी भूमिका प्रशासनाने आधीच जाहीर केली होती. अमेरिका-चीनमधील व्यापारी युद्धामुळे शांघाय व हाँगकाँगमधील शेअर बाजारांनी एकदम आपटी खाल्ली. त्यानंतर दोघांनीही माघार घेतली आणि अमेरिकेने चीनवरील कर १०४ टक्क्यांवरून ३४ टक्क्यांवर आणला. चीननेही अमेरिकेवर तितकाच, म्हणजे ३४ टक्के कर लावला. २०२४ मध्ये अमेरिकेत सुमारे ९०० अब्ज डॉलर इतकी व्यापारी तूट आली होती. व्यापारी तूट म्हणजे निर्यातीपेक्षा आयात जास्त. 'पृथ्वीवरचा प्रत्येक देश गेल्या कित्येक वर्षांपासून अमेरिकेला लुटत आहे. आता इथून पुढे तसे होऊ देणार नाही,' अशी गर्जना ट्रम्प यांनी केली आहे.

वाढीव आयात शुल्कामुळे बाहेर देशांतून येणारा माल विकत घेण्याऐवजी, देशांतर्गत माल लोक खरेदी करतील. त्यामुळे अमेरिकेच्या उत्पादन क्षमतेत वाढ होईल आणि नोकर्याही वाढतील, असे त्यांना वाटते; पण स्पर्धेअभावी अमेरिकेतील वस्तूंच्या किमती वाढून महागाई आकाशाला पोहोचेल, हे ट्रम्प यांना कळत नाही का? अमेरिकेने रशियाबाबत भारतावर लादलेल्या दंडाच्या कारवाईची गांभीर्याने दखल घेताना, भारताचे रशियाशी कसे संबंध असावेत, याबाबत तिसर्या देशाने नाक खुपसू नये, असा सूचक इशारा भारताने दिला.

आता 'ब्रिक्स'मधील अन्य सदस्य देशांपेक्षा (चीन व दक्षिण आफ्रिका) भारतावरील अमेरिकेचा कर अधिक असणार आहे. तसेच, निर्यातीत प्रतिस्पर्धी असलेल्या आशियातील व्हिएतनाम व बांगला देशच्या तुलनेत भारताला जास्त झळ सोसावी लागणार आहे. भारताच्या अमेरिकेतील ५५ टक्के निर्यातीला याचा फटका बसू शकतो, अशी भीती 'फेडरेशन ऑफ इंडियन एक्स्पोर्टर्स असोसिएशन्स'ने व्यक्त केली आहे. स्पर्धेत टिकायचे असेल, तर नुकसान सोसून माल विकण्याची वेळ भारतीय निर्यातदारांवर येऊ शकते. भारतातील सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगाला याचा सर्वाधिक फटका बसेल आणि यामुळे बेरोजगारीही वाढू शकते. 'गोल्डमन सॅक्स' या पतमानांकन संस्थेने भारताचा विकास दर यंदा ०.१ टक्क्याने आणि पुढील वर्षी ०.२ टक्क्याने घटेल, असा अंदाज व्यक्त केला. वास्तविक, अमेरिकेने भारतावर केलेला हा थेट अन्याय आहे.

भारताने रशियाकडून आयात करू नये, अशी अपेक्षा ठेवणार्या अमेरिकेने स्वतः मात्र रशियाकडून खते, मोती, मौल्यवान खडे, धातू, रसायने, लाकूड, यंत्रसामग्री, अणुभट्टी, लोह व पोलाद, तेलबिया, फळे, धान्य, इलेक्ट्रिकल व इलेक्ट्रॉनिक वस्तू, दुधोत्पादने, पादत्राणे यासारख्या अगणित वस्तू मोठ्या प्रमाणात आयात केल्या आहेत. ज्यावेळी, म्हणजे फेब्रुवारी २०१४ मध्ये रशियाने युक्रेनचा क्रिमिया प्रांत ताब्यात घेतला, त्या काळातही अमेरिकेने रशियाशी व्यापार थांबवला नव्हता, हे विशेष. गेल्या साडेतीन वर्षांत रशियाचे युक्रेनसोबतचे युद्ध सुरू असतानाही, ४.१६ अब्ज डॉलरची आयात रशियाकडून केली.अशावेळी भारताने रशियाकडे तोंड फिरवावे, असे ट्रम्प कोणत्या तोंडाने म्हणू शकतात? भारताची अर्थव्यवस्था मृत असल्याचा शेरा त्यांनी मारला; पण जागतिक वाढीत भारताचे सुमारे १८ टक्के योगदान आहे, तर अमेरिकेचे केवळ ११ टक्के. चालू आर्थिक वर्षासाठी भारताचा जीडीपी साडेसहा टक्क्यांवर कायम राहील, असा अंदाज रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनीही व्यक्त केला. अमेरिकेने कितीही आडदांडपणा केला, तरीही भारताची घोडदौड थांबणार नाही. काही प्रमाणात जरूर फटका बसेल; पण अमेरिकेलाही भारतासारख्या विशाल बाजारपेठेची गरज आहेच. शिवाय, ट्रम्प यांनी कितीही बेछूट वक्तव्ये केली, तरी भारताने सुस्पष्ट; पण संयमी प्रतिक्रियाच दिल्या. उभय देशांदरम्यान व्यापार करारावरील चर्चा अजूनही सुरू आहे. हा करार अनुकूल असावा, या हेतूनेच ट्रम्प यांनी ही दादागिरी आरंभलेली आहे. भारताने मात्र अमेरिकेस काही सवलती देण्याची तयारी देतानाच, खंबीर भूमिका कायम ठेवली पाहिजे.

# रविवारपासून धावणार वंदेभारत



## आठवड्यातून ६ दिवस सेवा, बडनेरा येथे २ मिनिटाचा थांबा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती-** विदर्भातील प्रवाशांकडून प्रतीक्षेत असलेली नागपूर (अजनी) पुणे स्लीपर वंदे भारत ट्रेन अखेर १० ऑगस्टपासून सुरू होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी अन्य दोन गाड्यांसोबतच अजनी-पुणे वंदे भारत एक्स्प्रेसला हिरवा झेंडा दाखवणार आहे. या गाडीला अकोला येथे नुकताच दोन मिनिटाचा थांबा जाहीर झाला आहे. वेगवान गाडीमुळे अकोला-पुणे अंतर ६.५० मिनिटात पूर्ण करता येणार आहे.

२६१०२ अजनी (नागपूर)- पुणे वंदे भारत सकाळी ९.५० वाजता अजनी येथून सुटेल आणि त्याच दिवशी रात्री ९.५० वाजता पुणे पोहोचेल. तसेच २६१०१ पुणे-अजनी वंदे भारत एक्स्प्रेस सकाळी ६.२५ वाजता पुणे रेल्वे स्थानकावरून निघेल आणि सायंकाळी ६.२५ वाजता अजनी (नागपूर) पोहोचेल. अजनी-पुणे वंदे भारत एक्स्प्रेस नागपूर- पुण्यादरम्यान चा प्रवास करताना वर्धा, बडनेरा, अकोला, भुसावळ, जळगाव, मनमाड आणि कोपरगाव, अहमदनगर, दौंड, पुणे या स्थानकांवर थांबे घेणार आहे. अजनीवरून सुटणारी गाडी सोमवारी, तर पुण्यातून सुटणारी गाडी मंगळवारी एक दिवस वगळून आठवड्याचे सहा दिवस उपलब्ध असेल.

### असा राहिल बडनेरा येथे थांबा :

२६१०२ अजनी-पुणे वंदे भारत एक्स्प्रेस वर्धा १०.४०-१०.४२ वाजता, बडनेरा १२.३-१२.५, अकोला दुपारी १-१.२, भुसावळ २.४४-३.००, जळगाव ३.२६-३.२८ असे थांबे घेत पुणे जाईल तर, २६१०१ पुणे-अजनी वंदेभारत एक्स्प्रेस सकाळी ६.२५ वाजता पुण्यातून निघून दुपारी ३.०३ ते ३.०५ वाजता अकोल्यात थांबा घेईल.




## अळूचे पान म्हणजे सुपरफूड! कर्करोगापासून ते मधुमेहापर्यंत ठरते गुणकारी

**दि. ८विदर्भ प्रजासत्ताक**
पावसाळा सुरू झाला की गरमागरम भजी आणि वड्यांचे वेध लागतात. यातही कुरकुरीत, चविष्ट 'अळूवडी'चा क्रमांक नेहमीच वरचा असतो. पिढ्यानपिढ्या आपण हा पदार्थ खात आलो आहोत, पण कधी तुम्ही विचार केला आहे का, की चवीला अप्रतिम लागणारी ही अळूची पाने आरोग्यासाठी किती फायदेशीर ठरू शकतात?

अनेकजण याला एक सामान्य भाजी मानतात, पण आरोग्य तज्ज्ञ आणि वैज्ञानिक संशोधनानुसार, ही साधी दिसणारी पाने म्हणजे पोषक तत्वांचा खजिना आहेत. चला तर मग, या पारंपरिक पदार्थाकडे एका नव्या आणि आरोग्यदायी दृष्टिकोनातून पाहूया आणि जाणून घेऊया की अळूची पाने खरंच आपल्या आरोग्यासाठी कशी फायदेशीर ठरतात.

आळूच्या पानात दडलेले पोषक घटक

अळूच्या पानांमध्ये अनेक महत्त्वाची जीवनसत्त्वे आणि खनिजे आढळतात. ही पाने विशेषतः:

व्हिटॅमिन ए डोळ्यांच्या आरोग्यासाठी अत्यंत आवश्यक.

व्हिटॅमिन सी रोगप्रतिकारशक्ती वाढवणारे एक शक्तिशाली अँटीऑक्सिडंट.

पोटॅशियम रक्तदाब आणि हृदयाचे आरोग्य नियंत्रणात ठेवण्यासाठी महत्त्वाचे.

लोह आणि फोलेट : रक्ताची कमतरता (निमिया) दूर करण्यास मदत करते.

फायबर (तंतुमय पदार्थ): पचनक्रिया सुधारण्यासाठी आणि वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी उपयुक्त.

आळूच्या पानांचे आरोग्यदायी फायदे

डोळ्यांच्या आरोग्यासाठी वरदान: अळूच्या पानांमध्ये व्हिटॅमिन ए आणि बीटा-कॅरोटीन मुबलक प्रमाणात असते. हे घटक दृष्टी सुधारण्यास आणि डोळ्यांशी संबंधित आजार, जसे की मोतीबिंदू आणि रातांधळेपणा, यांचा धोका कमी करण्यास मदत करतात.

रक्तदाब नियंत्रणात ठेवते: या पानांमध्ये असलेले पोटॅशियम शरीरातील सोडियमची पातळी संतुलित ठेवण्यास मदत करते, ज्यामुळे रक्तवाहिन्यांवरील ताण कमी होतो आणि उच्च



रक्तदाब नियंत्रणात राहतो.

प्रतिकारशक्ती वाढवते : व्हिटॅमिन सी चा उत्तम स्रोत असल्याने, अळूची पाने शरीराची रोगप्रतिकारशक्ती मजबूत करतात. यामुळे सर्दी, खोकला यांसारख्या सामान्य संसर्गांपासून संरक्षण मिळते.

वजन कमी करण्यास मदत: अळूच्या पानांमध्ये कॅलरीज कमी आणि फायबरचे प्रमाण जास्त असते. फायबरमुळे पोट बराच काळ भरलेले राहते आणि लवकर भूक लागत नाही, ज्यामुळे वजन नियंत्रणात ठेवण्यास मदत होते.

मधुमेहींसाठी फायदेशीर: या पानांचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी असतो आणि फायबरमुळे रक्तातील साखर हळूहळू शोषली जाते. यामुळे रक्तातील साखरेची पातळी अचानक वाढत नाही, जे मधुमेहींसाठी फायदेशीर आहे.

कर्करोगाचा धोका कमी करू शकते: अळूच्या पानांमध्ये पॉलिफेनॉल्ससारखे शक्तिशाली अँटीऑक्सिडंट्स असतात. हे अँटीऑक्सिडंट्स शरीरातील फ्री-रॅडिकल्सशी लढतात, जे पेशींना नुकसान पोहोचवून कर्करोगासारख्या गंभीर आजारांना कारणीभूत ठरू शकतात.

# आता प्रत्येक शेताला मिळणार १२ फुटांचा शेतरस्ता; पाणंद रस्त्यांसाठी येणार 'ही' योजना

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

**दि. ८विदर्भ प्रजासत्ताक**
प्रत्येक शेताला रस्ता मिळाला पाहिजे, ही राज्य शासनाची भूमिका आहे. यानुसार पाणंद रस्ते तयार करण्याबाबत तयार करण्यात आलेल्या समितीच्या पहिल्या बैठकीत याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

पाणंद रस्ते तयार करण्याबाबत सप्टेंबर अखेर सर्वंकष धोरण तयार करण्यात येणार असल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेत/पाणंद रस्ते तयार करण्याबाबत महसूल मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीची पहिली बैठक मंत्रालयात झाली.या बैठकीस ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले, वित्त व नियोजन राज्यमंत्री ड.आशिष जयस्वाल यांच्यासह समिती सदस्य आमदार, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.महसूल मंत्री श्री.बावनकुळे म्हणाले, शेत/पाणंद रस्ता हा शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्त्वाचा आहे. प्रत्येकाच्या शेताला रस्ता मिळावा या उद्देशाने शासनाने १२ फुटांचा रस्ता करण्याचा निर्णय घेतला आहे.हा रस्ता तयार करण्याबाबत आजच्या बैठकीत विविध सूचना करण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे जमाबंदी आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील एका समितीने याबाबत अभ्यास करुन सूचना केल्या आहेत.या सर्वांचा अभ्यास करण्यासाठी महसूल विभागाच्या अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यास गट तयार करण्यात येईल.सर्व संबंधित विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश असलेल्या या अभ्यास गटाने १५ दिवसांत आपला अहवाल आणि सूचना दिल्यानंतर समिती आणि अभ्यासगटाच्या बैठका होऊन सप्टेंबर अखेर अंतिम आराखडा मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर केला जाईल, असे त्यांनी सांगितले.

ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे म्हणाले, शेत/पाणंद रस्त्यांसंदर्भातील कायदे आणि प्रत्यक्ष परिस्थिती यांचा मेळ घालून मध्यम मार्ग काढावा. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या धर्तीवर स्वतंत्र निधीची तरतूद करून दर्जेदार रस्ते तयार करावेत.




शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

यासाठीचे जुने शासन निर्णय रद्द करुन नवीन शासन निर्णय काढावा आणि यामध्ये खासगी जागेत रस्ता तयार करण्यासाठीची तरतुदीचा स्पष्ट उल्लेख असावा, अशी सूचना त्यांनी केली.

रोजगार हमी योजना मंत्री श्री. गोगावले यांनी कंत्राटदारांना निधी उपलब्ध करुन देण्यासाठी निधी उपलब्ध होत असल्याचे सांगितले. राज्यमंत्री ड.जयस्वाल यांनी शेत/पाणंद रस्त्यांचे काम हा प्राधान्याचा विषय ठरवून याबाबत अंमलबजावणी होणे आवश्यक असल्याचे सांगितले.

यासाठी स्वतःहून जमीन देणाऱ्या शेतकऱ्यांना इतर योजनांमध्ये लाभ देण्यात यावेत, तसेच रस्त्याचे काम दर्जेदार होण्यासाठी कंत्राटदाराला डिफेक्ट लायबिलिटी कालावधी निश्चित करुन द्यावा, असेही ते म्हणाले.यावेळी उपस्थित समिती सदस्यांनी शेत/पाणंद रस्ते तयार करण्याच्या शासनाच्या निर्णयाचे सर्व स्तरांतून स्वागत होत असल्याचे सांगून यासंबंधी विविध सूचना केल्या. जमाबंदी आयुक्त सुहास दिवसे यांनी दूरदृश्यप्रणालीद्वारे बैठकीत सहभागी होत याबाबतचे सादरीकरण केले.

# विद्यार्थ्यांचे जीव धोक्यात, वर्गखोल्या अन् छत कोसळण्याची भीती

## ऐरंडगाव जिल्हा परिषद शाळतील १३ वर्गखोल्यांची स्थिती धोकादायक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८दर्यापूर -** तालुक्यात एकूण १२६ जिल्हा परिषद शाळांची संख्या आहे. एकूण वर्गखोल्यांची संख्या ४२३ असून १३ वर्ग खोल्या शिकस्त झाल्याची माहिती समोर आली आहे.

या शाळेची स्थिती इतकी बिकट आहे की वर्गखोल्यांचे छंपर कोणत्याही क्षणी कोसळू शकते. तर कुठे भिंत कोसळून विद्यार्थ्यांचे जीव धोक्यात येवू शकतात. या संदर्भात पालक व स्थानिक ग्रामस्थांनी वारंवार तक्रारी केल्या आहेत. मात्र अद्याप काहीही सुधारणा झालेली नाही. तसेच ज्या अत्याधिक धोकादायक शिकस्त शाळा आहेत, या ठिकाणी विद्यार्थ्यांना बसवण्यात येवू नये असे आदेश शिक्षण विभागाच्या वतीन देण्यात आल्याची माहिती मिळाली आहे. शासनाच्या वतीने राइट टू अॅक्ट या कायद्या अंतर्गत मुलांना सक्तीचे शिक्षण देण्याचे आदेश देण्यात आले आहे. यात पालकांना फी संदर्भात सुविधा





देखील उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत, मात्रदुसरीकडे जिल्हा परिषदेच्या शाळे संदर्भात कोणतेच आदेश घेण्यात आले नाही. तालुक्यातील ओक ठिकाणी वारंवार मागणी करून देखील शाळा दुरुस्ती केली जात नाही. पाणी, स्वच्छता, बसण्याची सुविधा यापैकी काहीच उपलब्ध करून दिल्या जात नसल्याने जिल्हा परिषदेच्या शाळेत मुले असुविधा च भीतीच्या सावटाखाली शिक्षण घेत असल्याचे चित्र आहे. राज्य शासनाच्या शिक्षण हक्क कायद्याचे कागदोपत्रीच नियोजन आहे.

या शाळा शिकस्त :शाळेचे दोन प्रकार आहेत. यात एक म्हणजे संपुर्ण इमारत ही धोकादायक असणे, ज्यांची भिंत, छत कधीही कोसळू शकते अशी व दुसरा प्रकार म्हणजे डगडुजीची गरज असलेल्या शाळांना निधीची आवश्यकता आहे.

### शिकस्त शाळांचे प्रस्ताव वरिष्ठांना पाठवले

शिकस्त शाळांसंदर्भात वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा सुरू आहे. तसेचठिक-ठिकाणच्या शिकस्त झालेल्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना बसवू नये. अशा सूचना संबंधित शिक्षकांना दिल्या आहेत. - संतोष घुगे, प्रभारी गटशिक्षणअधिकारी, दर्यापूर-

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. ८ ऑगस्ट २०२५

शहर/ग्रामिण

# राज्य आदर्श पुरस्कारासाठी जिल्ह्यातील ३० शिक्षक रिंगणात!

## १३ ऑगस्टपर्यंत होणार बाह्य मूल्यमापन

सुधीर केने

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती –** अमरावती-राज्यातील शिक्षण क्षेत्रात आदर्श पुरस्काराची एक उत्सुकता लागली असते. परंतु यावर्षी या पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे प्रमाण अत्यल्प आहे .अमरावती जिल्ह्यातून अवघ्या ३० शिक्षकांनी या पुरस्कारासाठी अर्ज दाखल केले आहेत. या शिक्षकांचे बाह्य मूल्यमापन ७ ऑगस्ट ते १३ ऑगस्ट या कालावधीत होणार आहे .तर १४ ऑगस्ट रोजी डायट मध्ये संबंधित शिक्षकांच्या मुलाखती पार पडणार आहेत.दरवर्षी राज्य शासनातर्फे राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार अर्थात क्रांतीज्योती

### स्काऊट गाईड पुरस्कारासाठी अर्जच नाही

सावित्रीबाई फुले राज्यशिक्षक गुणगौरव पुरस्कार वितरित केले जातात. त्यासाठी ऑनलाईन नामांकन मागविले जातात. यावर्षी अमरावती जिल्ह्यातून ३० नामांकन प्राप्त झाले आहेत. यामध्ये प्राथमिक विभागातून ७,माध्यमिक विभागातून १०, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कारासाठी ७ नामांकन प्राप्त झाले आहेत .आदिवासी विभागातील राज्य आदर्श पुरस्कारासाठी ३ तर विशेष शिक्षक कला आणि क्रीडा या प्रवर्गातून २ नामांकन प्राप्त झाले आहे. दिव्यांग कॅटेगिरीतून फक्त एकाने नामांकन भरले आहे.जिल्ह्यातील १४ तालुक्याचा विचार करता वरुड तालुक्यातून ४, चांदूरबाजार तालुक्यातील २, मोर्शी तालुक्यातून ३, अमरावती मनपा क्षेत्रातून ४,भातकुली १, धारणी ३ ,दर्यापूर १, तिवसा २,चिखलदरा ४, अमरावती ग्रामीण मधून १, अंजनगाव सुर्जी तालुक्यातून १ तर अचलपूर तालुक्यातून ४ शिक्षकांनी विविध प्रवर्गातून आपले नामांकन सादर केले आहे.या सर्व शिक्षकांच्या कार्याचे बाह्य मूल्यमापन ७ ऑगस्ट ते १३ ऑगस्ट या दरम्यान द्वि सदस्य पथकाद्वारे केले जाणार आहे. विशेष म्हणजे या पुरस्कारामध्ये स्काऊट गाईड या प्रवर्गातून एक स्काऊट आणि एक गाईड अशा प्रमाणे पुरस्कार दिला जातो परंतु अमरावती जिल्ह्यातून स्काऊट गाईड या प्रवर्गातून एकाही शिक्षकाने नामांकन भरले नाही हे विशेष.




### १४ ऑगस्ट ला मुलाखती

जिल्ह्यातील ज्या शिक्षकांनी राज्य आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी आपले नामांकन दाखल केले त्यांचे बाह्यमूल्यमापन झाल्यानंतर १४ ऑगस्ट २०२५ रोजी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अर्थात डायट येथे सकाळी ११ वाजता पासून या शिक्षकांच्या मुलाखती घेतल्या जाणार आहेत्यामुळे संबंधित शिक्षकांनी सकाळी ११ वाजता आवश्यक कागदपत्रासह उपस्थित राहावे असे आवाहन शिक्षणाधिकारी माध्यमिक यांनी केले आहे.

# गटशिक्षण अधिकाऱ्यांच्या अचानक भेटीत सहा शिक्षक लेटलतीफ ,अधिकारी संतप्त



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८नांदगाव पेठ–** शासनाच्या शिक्षण विभागामार्फत ग्रामीण भागातील शाळांमध्ये गुणवत्ता सुधारण्यासाठी विविध उपाययोजना राबवल्या जात आहेत. मात्र, शाळांतील शिक्षकांच्या शिस्तीबाबत अजूनही दुटप्पीपणा दिसून येतो. याच पार्श्वभूमीवर अमरावती पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी बोडखे आणि शिक्षण विस्तार अधिकारी खोडे यांनी आज येथील जिल्हा परिषद हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाला अचानक भेट दिली असता या अनपेक्षित भेटीदरम्यान शाळेतील सहा शिक्षक लेटलतीफ आढळले. सहा शिक्षक निर्धारित वेळेच्या तब्बल अर्धा तास उशिरा उपस्थित झाल्याचे निष्पन्न झाले.

शाळेचा ठरलेली निर्धारित वेळ सकाळी १०:३० असूनही शिक्षक उशिरा आल्याने अधिकाऱ्यांनी शाळेचे प्राचार्य देवेंद्र ठाकरे यांच्याकडे याबाबत जाब विचारला.गटशिक्षण अधिकारी बोडखे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, सर्व शिक्षकांनी वेळेचे काटेकोर पालन करणे अनिवार्य आहे. विद्यार्थ्यांना वेळेवर आणि शिस्तबद्ध शिक्षण देणे ही प्राथमिक जबाबदारी आहे. यावेळी त्यांनी सर्व शिक्षकांना तात्काळ वेळेच्या शिस्तीचे पालन करण्याचे निर्देश दिले. यावेळी भेटीदरम्यान माजी जिल्हा परिषद सदस्य नितीन हटवार, शाळा समितीचे माजी अध्यक्ष अरुण राऊत, तसेच पालक मनोज मोरे हे देखील उपस्थित होते. अधिकाऱ्यांनी शाळेच्या कार्यप्रणालीचा आढावा घेत विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला.

विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रम, उपक्रम, व त्यांच्या अडचणी याबाबत माहिती घेतली.यावेळी नितीन हटवार यांनी पालक, शिक्षक आणि लोकप्रतिनिधींमध्ये समन्वयाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, शाळेचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सक्षम शिक्षण देण्यासाठी सर्व घटकांनी एकत्रितपणे काम करणे आवश्यक असल्याचे मत हटवार यांनी व्यक्त केले. जिल्हा परिषदेच्या शाळा सक्षम व आकर्षक बनाव्यात.जिल्हा परिषदेच्या शाळेचा दर्जा उंचावत राहिला, तर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा कल खासगी शाळांऐवजी जिल्हा परिषदेच्या शाळांकडे वाढेल, आणि शिक्षण अधिक समृद्ध होईल,असे मत नितीन हटवार यांनी व्यक्त केले.या ठिकाणी अकरावी व बारावीला मंजूर तीन पदे असताना केवळ एक शिक्षक या ठिकाणी कार्यरत आहे त्यामुळे उर्वरित दोन पदे ताबडतोब भरण्याची विनंती देखील यावेळी नितीन हटवार यांनी अधिकाऱ्यांकडे केली.

# पूर्व खासदार नवनीत राणा यांना 'सर तन से जुदा' करण्याची धमकी

## राजापेठ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.८ अमरावती –** अमरावतीच्या माजी खासदार नवनीत राणा यांना सोशल मीडियावरून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. इंस्टाग्रामवरील एका रीलच्या माध्यमातून ही धमकी देण्यात आली असून, संबंधित रीलमध्ये नवनीत राणा यांच्याविषयी अश्लील व अपमानास्पद भाषा वापरण्यात आली आहे. या प्रकरणी राणा यांचे स्वीय सहाय्यक विनोद गुहे यांनी राजापेठ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, ईसा भाई या इंस्टा खात्याच्या वापरकर्त्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



विनोद गुहे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ६ ऑगस्ट रोजी रात्री ८.३० च्या सुमारास ते इंस्टाग्राम पाहत असताना त्यांना ईसा भाई या नावाने असलेल्या खात्यावर एक रील दिसली. या रीलमध्ये एक युवक लाल शर्ट घालून वाहनात बसलेला दिसतो आणि नवनीत राणा यांच्याविरोधात अश्लील भाषेत बोलतो. ही नवनीत राणा, हिंदुस्थान सगळ्यांचं आहे – हिंदू, मुस्लिम, शीख, ख्रिश्चन – सगळे भाऊभाऊ आहेत, तू आधीही मार खाल्ली आहेस, आता थेट हत्या करणार, असे म्हणत त्या व्यक्तीने थेट जीवे मारण्याची धमकी दिली.या प्रकारामुळे निर्माण झालेल्या धक्कादायक वातावरणामुळे विनोद गुहे यांनी त्वरित राजापेठ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी सदर इसा भाईविरोधात गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. बॉक्स यापूर्वीही मिळाल्या आहेत धमक्यानवनीत राणा यांना यापूर्वीही धमक्यांचा सामना करावा लागला आहे. ऑक्टोबर २०२४ मध्ये त्यांना गँगरेप करण्याची धमकी देणारे पत्र मिळाले होते. तर मे २०२५ मध्ये नवनीत राणा आणि त्यांच्या पतीला पाकिस्तानमधून आलेल्या क्रमांकावरून धमकीचे फोन आले होते. याशिवाय धमकीची अनेक ईमेल्स देखील आल्या होत्या.






# अमरावती महानगरपालिकेत वाहतूक व्यवस्थेसंदर्भात महत्त्वपूर्ण बैठक

## पार्किंग झोन, ट्राफिक सिग्नल संदर्भात निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८ अमरावती–** अमरावती शहरातील वाहतूक आणि नागरी सोयी-सुविधा अधिक सुयोग्य आणि शिस्तबद्ध करण्याच्या दृष्टीने महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या अध्यक्षतेखाली आज अमरावती महानगरपालिकेत एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.शहरातील वाढती वाहतूक कोंडी, अपुरी पार्किंग व्यवस्था आणि फूटपाथवरील अनधिकृत व्यवसाय यामुळे नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीत खालील मुद्द्यांवर निर्णय घेण्यात आले:

**नवीन पार्किंग झोनची आखणी:** शहरातील वाहतूक भार लक्षात घेता काही प्रमुख ठिकाणी नव्याने पार्किंग झोन निश्चित केले जाणार असून, अपुऱ्या जागांमुळे निर्माण होणाऱ्या अडचणी दूर केल्या जातील. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित येणा-या रोडवर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून, महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाच्या अखत्यारित येणा-या रोडवर महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाकडून झेब्रा क्रॉसिंग, पार्कींग मार्कींग रस्त्यावर पट्टे मारणे ही कार्यवाही ट्राफीक विभागाच्या सुचनेवरुन करण्याचे ठरविण्यात आले. सर्व मंगल कार्यालय, हॉटेल, दवाखाने यांचे पार्कींग त्वरीत सुरु करण्याचे स्पष्ट निर्देश या बैठकीत देण्यात आले.



**ट्राफिक सिग्नलचे आधुनिकीकरण:–** वाहतूक नियंत्रित ठेवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित स्मार्ट ट्राफिक सिग्नल्स बसवले जाणार आहेत व ज्या ठिकाणी सिग्नल पाहिजे आहे त्या ठिकाणची माहिती ट्राफीक विभागाने महानगरपालिकेला देण्याचे ठरविण्यात आले. ऑटो स्टँन्ड तयार करुन ते घोषित करावे.या बैठकीस ट्राफिक पोलीस विभाग, टाऊन प्लॅनिंग विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि इतर संबंधित अधिकाऱ्यांची उपस्थिती होती. बैठकीदरम्यान सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वय साधत ठोस कृती आराखडा तयार करण्याचे आश्वासन दिले.आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी सांगितले की, अमरावती शहराच्या शाश्वत आणि सुटसुटीत विकासासाठी शहरातील वाहतूक आणि नागरी व्यवस्था सक्षम करणे अत्यावश्यक आहे. आजच्या बैठकीत घेतलेले निर्णय लवकरच प्रत्यक्ष अंमलात आणले जातील.आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी निर्देश दिले की, पार्किंग व्यवस्थेचा पुनर्विचार तसेच शहरातील प्रमुख बाजारपेठा, हॉस्पिटल परिसर, शैक्षणिक संस्थांजवळ आणि गर्दीच्या भागांमध्ये नव्याने पार्किंग झोन निश्चित करण्यात यावेत. जुनाट, कार्यक्षम नसलेले सिग्नल यंत्रणा तत्काळ बदलाव्यात.

अकार्यक्षम पार्किंग व्यवस्था आणि फूटपाथवरील अनधिकृत व्यवसाय यासारख्या समस्यांवर या पार्श्वभूमीवर महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी सर्व नागरीक, व्यापारी, फेरीवाले व वाहनचालक बांधवांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे की, नियमित पार्किंगचा वापर करावा, अनधिकृत ठिकाणी वाहने लावू नयेत. फूटपाथचा वापर फक्त पादचाऱ्यांसाठी राहील याची काळजी घ्यावी. ट्राफिक सिग्नलचे पालन करावे, वाहतूक पोलिसांना सहकार्य करावे. महानगरपालिकेच्या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, सूचना व अभिप्राय देण्यास पुढे यावे. आपले अमरावती शहर स्वच्छ, सुंदर आणि सुव्यवस्थित होण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र येणे गरजेचे आहे. नागरी सहभागाशिवाय कोणतेही शहर विकसित होऊ शकत नाही. त्यामुळे प्रत्येकाने जबाबदारीने वागून शहराच्या प्रगतीत आपले योगदान द्यावे.या बैठकीस पोलीस उपायुक्त शाम घुगे, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, उपायुक्त डॉ.मेघना वासनकर, ट्राफीक सहाय्यक आयुक्त खताळे साहेब, पोलीस निरीक्षक प्रविण वांगे, वाहतूक पोलीस निरीक्षक ज्योती विल्हेकर, पोलीस निरीक्षक सुनिल चव्हाण, पोलीस निरीक्षक रिता उईके, पोलीस निरीक्षक वडगावकर, पोलीस निरीक्षक उर्लागोंडावार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता तुषार काळे, प्रकाश उमाळे, सहाय्यक नगर रचनाकार कांचन भावे, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, नितीन बोबडे, बाजार व परवाना विभागाचे सहाय्यक आयुक्त दिपक खडेकार, उदय चव्हाण, पी.ओ. सबडिव्ही जन सनी जाधव, सार्वजनिक बांधकाम विभागाचे शाखा अभियंता ज्ञानेश्वर आगरकर, उपअभियंता प्रमोद इंगोले, आशिष अवसरे, शरद तिनखेडे, अतिक्रमण पथक प्रमुख योगेश कोल्हे, श्याम चावरे, कनिष्ठ अभियंता चि.प्र. देशपांडे, संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.


# वेतन न मिळाल्याने फिन्ले मिल कामगार पुन्हा चिमणीवर

## आ. प्रवीण तायडेंच्या मध्यस्थीनंतरही प्रश्न अधांतरीच

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अचलपूर –** येथील फिन्ले मिल तीन ते चार वर्षांपासून बंद असत्त्याने अनेक कामगारांवर उपासमारीची वेळ आली आहे. कामगारांनी त्रस्त होऊन आत्महत्या केल्या आहेत. अशा परिस्थितीतही एनटीसी प्रशासन कुठलीच कारवाई करत नसल्याने फिन्ले मिल कामगार मनोज रामसिंग सूर्यवंशी व विकेश नरेश उघडे या देघांनी चिमणीवर णीवर चढत थकीत वेतन व बोनस देण्यासोबतच फिन्ले मिल सुरू करण्यासाठी आंदोलन केले होते.

चार दिवस या कामगारांनी चिमणीवर चढत केलेल्या आंदोलना नंतर आ. प्रवीण तायडे यांनी आक्रमक भूमिका घेत मुंबई येथील एनटीसी अधिकाऱ्यांना अचलपूर येथे बोलावून कार्यरत असलेल्या कामगारांचे दोन महिन्यांचे वेतन तत्काळ करण्याबाबत लेखी आश्वासन घेतले. याला दोन महिने उलटले तरी अद्याप कामगारांना बोनस तर सोडाच वेतनही मिळाले नसल्याने पुन्हा गुरुवार, ७ऑगस्टला कामगारांनी चिमणीवर चढून आंदोलन सुरू सुरू केले. फिन्ले मिलने थकक्लेल्या वेतनामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या कामगारांनी आज पुन्हा एकदा मिलच्या चिमणीवर चढून आंदोलनाचा पवित्रा घेतला. दैनंदिन गरजा भागवणेही अवघड झाल्याने संतप्त झालेल्या काही कामगारांनी चिमणीवर चढून व्यवस्थापनाविरुद्ध घोषणाबाजी केली. – तत्काळ वेतन द्या, अन्यथा आंदोलन अधिक – तीव्र करण्याचा इशारा दिला. दोन महिने उलटून गेले तरी पगाराचा पत्ता नाही.व्यवस्थापनाकडे वारंवार मागणी करूनही कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याने हे टोकाचे पाऊल उचलावे लागल्याचे कामगारांचे म्हणणे आहे. फिन्ले मिलमधील वेतनप्रश्नी वारंवार निर्माण होणाऱ्या अशा गंभीर घटनांमुळे कामगारांच्या सुरक्षिततेचा व आर्थिक शाश्वतेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. कामगार संघटनांनी शासन आणि व्यवस्थापनाकडे तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली असून, कामगारांचा संयम सुटण्याआधी न्याय दण्याचीही मागणी होत आहे.



# सराफा बाजार परिसरामध्ये अवैध सावकारी; सहकार विभागाची धाड

## कोरे चेक, खरेदीखत, गहाण पावत्यांसह २९ दस्तऐवज जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८अमरावती–**येथील सराफा बाजार परिसरात सहकार विभागाने गुरुवारी धाडसत्र राबवले. या कारवाई दरम्यान सैफी गल्ली, बोहरा मशीदजवळील उषा ज्वेलर्समधून कोरे घनादेश, खरेदीखत, इसार पात्त्या व इतर कागदपत्रे मिळून २९ दस्तऐवज जप्त करण्यात आले. उषा ज्वेलर्सचे संचालक विकास सुभाषराव गायकवाड यांच्या पत्नीच्या नावे सावकारीचे लायसन्स आहे. त्याआडून काही गैरव्यवहार होत असल्याची तक्रार सहकार विभागाला मिळाली होती. त्यानुसार जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांच्या कार्यालयाने एक विशेष पथक गठित केले. वरुड येथील सहायक निबंधक आशिष चर्जन यांच्या नेतृत्वातील या पथकाने गुरुवारी दुपारी सव्वाबारा ते दुपारी ३.५५वाजेपर्यंत तपासणी केली. यावेळी अवैध सावकारी संबंधाने २९ संशयास्पद दस्तावेज आढळून आले. यात कोरे धनादेश, स्थावर मालमत्तेचे खरेदीखत, प्लॉटच्या इसार पावत्या, गहाण पावत्यांचा समावेश आहे.जप्त केलेल्या या दस्तावेजांची पडताळणी सन २०१४ च्या महाराष्ट्र सावकारी अधिनियमातील तरतुदी नुसार होणार आहे



# विदर्भातील सर्वात मोठी 'दहीहंडी'

## 'ऑपरेशन सिंदूर' ला समर्पित भव्य आयोजनाची तयारी सुरू



**दहिहंडीतील आकर्षण आणि सुविधा**

गोविंदा पथकांसाठी लाखो रुपयांची बक्षीसे व सहभागी प्रत्येक पथकाला प्रोत्साहनपर बक्षीस

एकल नृत्य स्पर्धा, गृप डान्स, राधा-कृष्ण सजावट स्पर्धा यांसारखी रंगतदार स्पर्धा

महिलांसाठी स्वतंत्र बसण्याची सुविधा, उत्कृष्ट सुरक्षा व्यवस्था, आरोग्य सुविधा, प्रशस्त पार्किंगया सोहळ्यासाठी राजकीय नेते, लोकप्रिय सिने अभिनेते-अभिनेत्री, उद्योजक, खेळाडू आणि इतर मान्यवरांची उपस्थिती अपेक्षित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती :-** भारतीय जनता पार्टी आणि युवा स्वाभिमान पार्टी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'ऑपरेशन सिंदूर' ला समर्पित विदर्भातील सर्वात मोठ्या दहिहंडी उत्सवाचे आयोजन यंदा अमरावतीत करण्यात येत आहे. रविवार, १७ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९ वाजता नवाथे चौक, अमरावती येथे या दहीहंडीचा थरार अनुभवायला मिळणार असून, या भव्य सोहळ्याची पूर्वतयारी बैठक नुकतीच पार पडली.

ही दहिहंडी 'ऑपरेशन सिंदूर' या भारतीय लष्कराच्या अद्वितीय आणि शौर्यपूर्ण कारवाईस समर्पित असणार आहे. पाकिस्तानातील दहशतवाद्यांविरोधात भारतीय लष्कराने दाखवलेल्या धाडसाला सलाम म्हणून हा ठराव बैठकीत एकमताने मंजूर करण्यात आला. ही संकल्पना आ. रवि राणा आणि मा. खासदार नवनीत राणा यांची असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली हा भव्य कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

### पूर्वतयारी बैठकीत महत्त्वपूर्ण चर्चा :

या आगळ्या-वेगळ्या आयोजनाची रूपरेषा युवा स्वाभिमान पार्टीच्या मुख्य कार्यालयात आयोजित बैठकीत ठरवण्यात आली. धडझ चे मार्गदर्शक श्री. सुनिल राणा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सुव्यवस्थित आयोजन, नाविन्यपूर्ण उपक्रम, व विविध सोयी-सुविधांवर चर्चा झाली. उपस्थित पदाधिकाऱ्यांनी उत्सव अधिकाधिक यशस्वी आणि आकर्षक व्हावा यासाठी विविध सूचना मांडल्या.

या वर्षीची दहिहंडी केवळ एक धार्मिक किंवा सांस्कृतिक कार्यक्रम न राहता, देशभक्ती, सामाजिक बांधिलकी आणि युवकांमधील उत्साह यांचे प्रतीक ठरणार आहे.

या बैठकीस सुनिल राणा, शैलेन्द्र कस्तुरे, कमलकिशोर मालानी, अजय गाडे, विनोद जायलवाल, ज्योती सैरीसे, विनोद येवतीकर, अजय देशमुख, सोनाली नवले, गणेशदास गायकवाड, नितीन बोरेकर, सुमती ढोके, अर्चना तालन, दिनेश टेकाम, अवि काळे, तुषार दुधे, प्रविण सावळे, अजय जयस्वाल, विलास वाडेकर, राकेश बडगुजर, समाधान वानखडे, चंद्रशेखर जावरे, अशोक पांडे, रमेश जसेकर, बाळकिशन पांडे, सचिन भेंडे, उदय पर्वतकर, श्याम कथे, किरण अंबाडकर, पराग चिमोटे, शंकर डोंगरे, अजय घुले, जगदीश गुल्हाने, विनोद गुहे, आशिष गावंडे, राजु हरणे, मकसुदभाई, ऋषीकेश जाधव, ओंकार मोहोड, नयन तायडे, माया धवने, सारीका अवघड, निता खडसे, विजु थोरात, मिथीलेश तिवारी, दिपा धाकडे, रईसा परविन, राजेश तरडेजा, आकाश पाटील, राजेंद्र कोरडे, नारायण राऊत, मनोज जाधव, संजय गायकवाड, गजानन शिंदे, राजेश आचलिया, पवन केशरवानी, पद्माकर गुल्हाने, स्वप्नील पाझनकर, अमित देशे, रामदास जसेकर, प्रतीक आडतीया, विजया घोडेस्वार, अश्विनी ढोके, शोभा किटके, पंकज बोबडे, गौतम हिरे, शुभम उबंरकर, उदवराव कराडे, अक्षय मेश्राम, अर्जुन दाते, शुभम जनबंधु, शुभम डोनालकर, वर्षा पाटने, मिना घोंगरे, सुनिल भोपसे, अनिल शुक्ला, अनिल मिश्रा, हरीष नाडे, निखिल आकोटकर, विनोद मुधोळकर, राजाभाऊ बाखडे, मोहन मुके, खुशाल गोंडाने, प्रदिप अलोने, अरुणा चचाने, हर्षल रेवणे, जागृती जोशी, रोहन शर्मा, श्रीकृष्ण बैलमारे, मंगेश इंगोले पाटील, नितीन मस्के, निरज गवई, भुषण पाटने, मुकेश वासेवाय, महेश मुलचंदानी, संजय मुनोत, महेंद्र सिरसाठ, उमेश डहाके, सतीश ढेपे, आनंद जयस्वाल, दिलीप भाकरे, किशोर मानकर, मुश्ताक खान, निकेश सोनोने, सायरा बानो यांची उपस्थिती होती.

---

### छत्रपती शिवरायांविषयी विकृत माहिती देणाऱ्या

# 'खालिद का शिवाजी' चित्रपटावर बंदीची मागणी

## राजकमल चौकात हिंदु जनजागृती समितीचे आंदोलन




**विदर्भ प्रजसत्ताक**

**दि.८ अमरावती-** छत्रपती शिवाजी महाराजांविषयी ऐतिहासिकदृष्ट्या खोटी, तथ्यहीन व विकृत माहिती देणाऱ्या 'खालिद का शिवाजी' या आगामी मराठी चित्रपटावर तात्काळ बंदी घालावी, अशी मागणी हिंदु जनजागृती समिती व समस्त हिंदुत्वनिष्ठ संघटनांकडून करण्यात आली. या मागणीसाठी गुरुवारी दुपारी ४ ते ५.३० वाजता राजकमल चौकात आंदोलन करण्यात आले.हिंदु जनजागृती समितीचे श्री. निलेश टवलारे म्हणाले, या चित्रपटात शिवाजी महाराजांच्या सैन्यात ३५% मुस्लिम सैनिक होते, ११ अंगरक्षक मुस्लिम होते आणि रायगडावर मशिद बांधली होती, असे भ्रामक दावे करण्यात आले आहेत. हे दावे कोणत्याही ऐतिहासिक पुराव्याविना केले असून ते जनतेची दिशाभूल करणारे आहेत.श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान युवा संघटनेचे अभिषेक दीक्षित यांनी सांगितले की, शिवभारत या ग्रंथात मुघल आक्रमणांपासून हिंदू समाजाचे रक्षण करण्याबाबत स्पष्ट उल्लेख आहे. तरीही या चित्रपटाद्वारे शिवाजी महाराजांचे चुकीचे चित्रण करून 'सेक्युलर' ठरवण्याचा हेतु पुरस्सर प्रयत्न होत आहे. समितीने प्रश्न उपस्थित केला की, शिवाजी महाराजांच्या काळात कोणतीही जातीय जनगणना नव्हती, मग ३५% मुस्लिम सैनिक असल्याचा दावा कसा करता येतो? तसेच, महाराजांविषयी मुस्लिम समाजाला आदर असता, तर इतिहासात किंवा अलीकडील काळात त्यांच्यावरील मूर्तीभंगा सारख्या घटना घडल्या नसत्या. संविधानातील अनुच्छेद १९(२) व भारतीय दंड संहिता कलम २९५(अ) नुसार, धार्मिक भावना दुखावणारे व कायदा-सुव्यवस्था बिघडवणारे चित्रण बेकायदेशीर ठरते, असेही समितीने नमूद केले. 'पद्मावत' आणि 'जोधा अकबर'प्रमाणेच या चित्रपटामुळे ही जनक्षोभ निर्माण होण्याची शक्यता असल्याने, अधिकृत सत्यापन होईपर्यंत 'खालिद का शिवाजी' चित्रपटावर बंदी घालण्याची मागणी करण्यात आली

---

# शेतात फार्म हाऊस ... कर्जमाफी मिळणार नाही - महसूलमंत्री बावनकुळे



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८छत्रपती संभाजीनगर -** राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा विषय लांबणीवर पडला नसून निवडणूक काळात भाजपाने कर्जमाफीचे आश्वासन दिले होते, ते पूर्ण करणार आणि गरजू व पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळेल, असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी छत्रपती संभाजीनगर येथे पत्रकारांना सांगितले.महसूलमंत्री बावनकुळे म्हणाले, 'योग्य शेतकऱ्यांना कर्जमाफी' देण्यावर सरकार भर देत आहे. त्यासाठी एक समिती नेमण्यात आली आहे, ती शेतकऱ्यांचे सर्वेक्षण करणार असून, त्या सर्वेक्षणानंतर गरजू आणि पात्र शेतकऱ्यांनाच कर्जमाफीचा लाभ मिळेल. कर्जमाफी ही 'मेरिट'वर झाली पाहिजे. ज्यांना खऱ्या अर्थाने मदत हवी आहे, अशा शेतकऱ्यांचा विचार केला जाईल. समाजातील सर्वात शेवटच्या घटकाला मदत करणे हे सरकारचे उद्दिष्ट आहे. समितीचा अहवाल आल्यानंतर कर्जमाफीबाबत अंतिम निर्णय घेतला जाईल. गुंठेवारीमध्ये अडकलेल्या घरमालकांना दिलासा देण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचे सांगत बावनकुळे म्हणाले, तुकडेबंदी कायद्यामुळे ज्या मिळकतींची नोंदणी होत नाही, अशा घरमालकांच्या समस्यांवर लक्ष दिले जात आहे. संभाजीनगर आयुक्तांना २०११ पूर्वीच्या गुंठेवारीतील बांधकामांची यादी तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जास्त आकारणी केली असल्यास ती कमी करून सर्वसामान्यांना दिलासा देण्याचा विचार असल्याचेही त्यांनी सांगितले.महसूल विभागातील अनेक जागांवर झालेली अतिक्रमणे, वर्ग-२ जमिनी वर्ग-१ मध्ये रूपांतरित करणे आणि पाणंद रस्त्यांवरील अतिक्रमणे काढणे यांसारख्या विषयांवर काम सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. शैक्षणिक दाखल्यांसाठी लागणाऱ्या ५०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरची अट रद्द करण्यात आली आहे.

---

# शिक्षणमंत्री दादा भुसे बैठकीतून निघताच वाद उफाळला

## जिल्हाप्रमुखांमध्येच हाणामारी



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८गडचिरोली-** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय गटबाजी पुन्हा एकदा समोर येत आहे. पक्षांतर्गत मतभेदांमुळे अनेक नेते पक्ष बदलण्याचा निर्णय घेताना दिसत आहेत. पक्षाचे वरिष्ठ नेते आणि मंत्र्यांच्या दौऱ्यादरम्यान ही गटबाजी अधिक उफाळून येते. असाच काहीसा प्रकार गडचिरोली जिल्ह्यामध्ये घडला, जिथे शिवसेना नेते आणि शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या दौऱ्यात शिंदे गटातील गटबाजी स्पष्टपणे दिसून आली.

या दौऱ्यात, शिवसेनेच्या दोन जिल्हा प्रमुखांमधील वाद इतका वाढला की, त्याचे रूपांतर थेट मारामारीत झाले. हा प्रकार पाहून उपस्थित स्थानिक नागरिकांनी मध्यस्थी करत दोघांनाही शांत केले. या घटनेमुळे स्थानिक राजकारणातील गटबाजी आणि त्यातून निर्माण होणारे तणाव पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहेत.

दोन जिल्हाप्रमुखांमध्ये जोरदार राडा

राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या गडचिरोली दौऱ्यात शिंदे गटातील अंतर्गत वाद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. सर्किट हाऊसमध्ये पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसोबतची बैठक आटोपून दादा भुसे चंद्रपूरकडे रवाना होताच, दोन जिल्हाप्रमुखांमध्ये जोरदार राडा झाला. हा वाद श्रेयवादातून सुरू झाल्याचे दिसून आले, आणि त्याचे पर्यवसान थेट हाणामारीत झाले.

यावेळी शिवसेना गडचिरोली जिल्हाप्रमुख संदीप ठाकूर आणि अहेरी जिल्हाप्रमुख राकेश बेलसरे यांच्यात जोरदार बाचाबाची झाली. मंत्र्यांच्या उपस्थितीत आयोजित बैठकीसाठी जिल्ह्यातून अनेक पदाधिकारी सर्किट हाऊसमध्ये आले होते. मात्र, मंत्री निघून जाताच दोन्ही पदाधिकाऱ्यांमध्ये सुरू झालेला वाद विकोपाला गेला, आणि ते एकमेकांना भिडले.

या घटनेमुळे शिंदे गटातील स्थानिक गटबाजी उघड झाली आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तोंडावर असताना अशा प्रकारचा वाद समोर आल्याने पक्षाला याचा फटका बसू शकतो, असा राजकीय अंदाज वर्तवला जात आहे.

---

# विभागांनी नागरिकांच्या तक्रारी निकाली काढाव्यात

## -जिल्हाधिकारी आशिष येरेकर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती,**

जिल्हाभरातील नागरिक त्यांच्या मागण्या पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे सादर करीत असतात. या तक्रारींचा विभागाच्या स्तरावर निपटारा होणे शक्य आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून विभागांना पाठविण्यात आलेल्या तक्रारी प्राधान्याने निकाली काढाव्यात, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले.

आज पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे आलेल्या निवेदनांवर जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी सुनावणी घेतली. यावेळी तक्रारदारांना ऑनलाईन उपस्थित राहण्याची सोय करण्यात आली. तक्रारदारांनी ऑनलाईन उपस्थित राहून तक्रारीबद्दल त्यांचे मत सांगितले. जिल्हाधिकारी यांनी तक्रारदारांचे म्हणणे ऐकून घेऊन संबंधित विभागांना सुचना केल्या.

पालकमंत्री श्री. बावनकुळे यांना व्यक्तिशः आणि त्यांच्या पालकमंत्री कार्यालयात नागरिक भेटी देऊन समस्यांबाबत निवदने सादर केली असतात. यातील निवडक तक्रारींवर संबंधित तक्रारदारांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. यावेळी तक्रारीच्या अनुषंगाने ऑनलाईन उपस्थित असलेल्या संबंधित विभागाप्रमुखांना निर्देश देऊन तक्रारीच्या अनुषंगाने समाधान करण्यात आले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, उपजिल्हाधिकारी विवेक जाधव, तहसिलदार प्रशांत पडघन, निलेश खटके आदी उपस्थित होते.

तक्रारींमध्ये अमरावती शहरातील दसरा मैदानावर अतिक्रमण होत असल्याची तक्रार करण्यात आली. याबाबत महापालिका आणि उपविभागीय अधिकारी यांच्या समन्वयाने ही अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करण्यात येईल. तसेच सध्यास्थितीमध्ये नोटीस बजावणे आणि अनुषंगिक बाबी पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. चांदस वाठोडा प्रकल्पातून होणाऱ्या पाझरामुळे फळपिकांचे नुकसान होत असल्याने नुकसान भरपाई देण्यासंदर्भात जलसंपदा विभागाने तातडीने कालव्यांची दुरूस्ती करावी, असे निर्देश देण्यात आले.

अंजनगाव बारी येथील वन विभागाच्या हद्दीमधील रस्त्याचे काम करण्याचे निर्देश वन विभागास देण्यात आले. यासाठी आवश्यक प्रस्ताव सादर करण्याचे सांगण्यात आले. परतवाडा येथील लाकुड बाजाराला देण्यात आलेली जमिन नियमानुकूल आणि स्थायी भाडेपट्टयावर देण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आल्यानंतर योग्य निर्णय घेण्यात येईल. तिर्थक्षेत्रचा क दर्जा असलेल्या हिम्मतपूर येथील नियमानुसार निधी देण्यात येईल, असे जिल्हाधिकारी यांनी सांगितले.



### पालकमंत्र्यांकडील २२ तक्रारींवर ऑनलाईन सुनावणी

---

# 'अवयवदान पंधरवडा' विविध जनजागृती उपक्रमांनी अमरावती शहरात उत्साहात सुरुवात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती-**

महाराष्ट्रातील अवयवदानाचे प्रमाण वाढावे व अवयवदानाच्या प्रतीक्षेतील रुग्णांना नवजीवन मिळावे यासाठी राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या मार्गदर्शनाखाली दि. ३ ते १५ ऑगस्ट दरम्यान 'अवयवदान पंधरवडा' ही एक चळवळ म्हणून राज्यभरात राबविली जाणार आहे. या कालावधीत व्यापक जनजागृती व समाजाभिमुख उपक्रम राबवण्याचे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दि. २८ जुलै रोजी मुंबई येथे झालेल्या राज्यस्तरीय नियोजन बैठकीत दिले होते. त्यानुसार या मोहिमेमध्ये शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था, धार्मिक संस्था, आरोग्य संस्था व सामाजिक कार्यकर्त्यांचा सक्रिय सहभाग घेतला जाणार आहे.

अवयवदान ही एक सामाजिक बांधिलकी आहे. समाजामध्ये या विषयाबाबत सकारात्मक मतपरिवर्तन घडवण्यासाठी प्रभावी जनजागृती अत्यावश्यक आहे. मोहिमेतून अवयवदानासंबंधी भीती, गैरसमज व अंधश्रद्धा दूर करून वैज्ञानिक माहिती लोकांपर्यंत पोहोचवणे महत्त्वाचे आहे. या पंधरवड्यात राज्यातील प्रत्येक जिल्हा, तालुका व आरोग्य संस्था स्तरावर, शाळा, महाविद्यालये येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून, १५ ऑगस्ट रोजी जिल्हास्तरावर अवयवदात्यांच्या कुटुंबीयांचा सन्मान करून मोहिमेला प्रेरणादायी रूप दिले जाणार आहे. 'अवयवदान पंधरवडा'मध्ये सोशल मिडिया जनजागृती मोहीम, अवयवदानावर ऑनलाइन व्याख्यान, रुग्णालय/क्लिनिकमध्ये क्युआर कोड पोस्टर प्रदर्शन, ओपीडी प्रतीक्षागृहात आरोग्य विषयक मार्गदर्शन, मंदिरे व बाजारपेठांमध्ये माहितीपत्रक वाटप, शाळा/रुग्णालयांमध्ये संकल्प भिंत / झाड उभारणी, वैद्यकीय कर्मचाऱ्यांसाठी जागरुकता सत्र,



महाविद्यालयांमध्ये पोस्टर/रांगोळी स्पर्धा, बाजारपेठेत स्थानिक भाषेत पथनाट्य, आय सपोर्ट ऑर्गन डोनेशन बॅज डे, शाळांमध्ये निबंध/चित्रकला स्पर्धा, स्थानिक कार्यक्रमात जनजागृती स्टॉल, अवयवदान जनजागृती रॅली असे विविध उपक्रम राबविण्यात येणार असून दि. १५ ऑगस्ट रोजी अवयवदात्यांच्या कुटुंबांचा सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे सत्कार जिल्हास्तरावर सत्कार करण्यात येणार आहे.राज्यात अवयवदानाचे महत्त्व लोकांपर्यंत पोहोचवून, महाराष्ट्राला या क्षेत्रात आघाडीवर नेणे हे या उपक्रमामागील उद्दिष्ट आहे. राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने या मोहिमेला जनतेच्या सक्रीय सहभागाने यशस्वी करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. या धरती वर शहरी आरोग्य केंद्र हमालपुरा येथे मा. अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, मा. डॉ विशाल काळे वैद्यकीय आरोग्य अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मनपा अमरावती यांच्या मार्गदर्शनाखालीआज दिनांक ०७ ऑगस्ट २०२५ रोजी अवयवदान प्रतिज्ञा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात उपस्थित अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत अवयवदानाची प्रतिज्ञा घेतली.या कार्यक्रमाचा उद्देश नागरिकांमध्ये अवयवदानाविषयी जनजागृती निर्माण करणे व मृत्यूनंतरही इतरांच्या आयुष्यात प्रकाश फेकण्याची भावना रुजवणे हा होता. उपस्थितांनी मानवतेच्या सेवेसाठी पुढाकार घेत अवयवदानाच्या महत्त्वाबद्दल जागरूकता दर्शवली.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अमरावती महानगरपालिका, आरोग्य विभाग, अतिक्रमण विभाग तसेच स्थानिक सामाजिक संस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले.अमरावती महानगरपालिका नागरिकांना आवाहन करते की, अधिकाधिक लोकांनी अशा उपक्रमांमध्ये सहभागी होऊन समाजात सकारात्मक परिवर्तन घडवावे. तसेच https://share.google/-K0yragxtGiJUp-7i या पोर्टलवर जास्तीत जास्त नोंदणी चे आवाहन करून प्रमाणपत्र बनवून घ्यावे.

# पश्चिम विदर्भात जून महिन्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतकऱ्यांसाठी ८६.२३ कोटी



**विदर्भ प्रजासत्ताक दि.८ अमरावती**

पश्चिम विदर्भात जून महिन्यामध्ये अतिवृष्टीसह पूर परिस्थिती निर्माण झाली होती. यामध्ये हजारो हेक्टरवरील शेत जमीन खरडून गेली. पिके पाण्याखाली गेली. अगोदरच विविध अडचणींचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना मोठा फटका बसला. त्यावर महसूल विभागाने सर्वेक्षण करून नुकसान भरपाईसाठी राज्य शासनाकडे प्रस्ताव सादर केला होता. त्याला राज्य शासनाने आता मंजुरी दिली असून पश्चिम विदर्भाच्या पाच जिल्ह्यातील नुकसानग्रस्त लाखावर शेतकऱ्यांना ८६.२३ कोटींची मदत वितरीत केली जाणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला.

अतिवृष्टी, पूर व चक्रीवादळ यासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेती पिकांचे नुकसान झाल्यास पुढील हंगामामध्ये उपयोगी पडावे, यासाठी शेतकऱ्यांना निविष्ठा अनुदान स्वरूपात एका हंगामात एक वेळेस याप्रमाणे राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून मदत देण्यात येते. जून महिन्यात पश्चिम विदर्भातील अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा व वाशीम या जिल्ह्यांत अतिवृष्टी व पूर यामुळे शेती पिकांच्या नुकसानीसाठी शेतकऱ्यांना मदत देण्याचा शासन निर्णय महसूल व वन विभागाने निर्गमित केला आहे.

जून महिन्यातील अतिवृष्टीमुळे अमरावती विभागात ९७ हजार ७८५ हेक्टर क्षेत्र बाधित झाले. त्यामुळे एक लाख सात हजार ४७२ शेतकऱ्यांचे नुकसान झाले. त्या शेतकऱ्यांच्या मदतीसाठी एकूण ८६ कोटी २३ लाख ३८ हजार रुपयांच्या निधी वितरण करण्यास शासनाची मंजुरी दिली. यामध्ये सर्वाधिक निधी बुलढाणा जिल्ह्याला देण्यात आला आहे. अमरावती जिल्ह्यात दोन हजार २४० शेतकऱ्यांचे एक हजार ३१२ हेक्टर शेत जमिनीचे नुकसान झाले होते. अमरावतीसाठी दोन कोटी ७५ लाख ७९ हजारांचा निधी मंजुर झाला.

# शिक्षक बँक नोकरभरती प्रकरण अखेर न्यायालयात दोषारोपपत्र दाखल




**विदर्भ प्रजासत्ताक दि.८अचलपूर**

शिक्षक बँक नोकरभरती प्रकरणी अखेर अमरावती येथील न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. शिक्षक बँकेच्या अध्यक्षासह सर्व संचालक आणि परीक्षा घेणाऱ्यांवर १३ डिसेंबर २०२४ रोजी कलम ४१० आणि १२० (ब) अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले होते. विस्तृत चौकशी केल्यानंतर १ ऑगस्ट २०२५ रोजी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

शिक्षक बँकेच्या पदभरतीत भ्रष्टाचार करण्यात आल्याने आमच्यावर अन्याय झाल्याची तक्रार निकेश बोंडे, सचिन नांदणे व सविता बोरवार या तीन परीक्षार्थींनी जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल केली होती. त्या अनुषंगाने विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था येथील श्रीमती भारस्वाडकर यांनी सखोल चौकशी करून आपला अहवाल जिल्हाधिकारी यांना सोपविला होता. त्यामध्ये अधिक चौकशीची गरज विशद करण्यात आली होती. त्यामुळे जिल्हाधिकारी यांनी पोलिस आयुक्त यांना कारवाई करण्याबाबत पत्र दिले होते. पोलिसांनी चौकशी सुरू केली; मात्र चौकशी पुढे सरकत नव्हती. दरम्यान चौकशी अधिकारी बदलले. त्यानंतर आर्थिक गुन्हेशाखेचे पोलिस निरीक्षक बाबाराव अवचार यांनी चौकशी सूत्रे आपल्या हातात घेतली. अवचार यांनी रखडलेल्या तपासाला गती दिली. तपासही पूर्ण झाला; मात्र पुन्हा पुढील प्रक्रिया आश्चर्यकारकपणे प्रलंबित राहिली. हा सर्व प्रकार बँकेच्या आरोपींसाठीअनुकूल ठरत होता. दरम्यान बँकेच्यावतीने गुन्हे रद्द करण्यासाठी प्रकरण दाखल करण्यात आले. याप्रकरणी न्यायालयाने अद्याप दोषारोपपत्र दाखल केले नसल्याबद्दल आश्चर्य व्यक्त करून ४ ऑगस्टपर्यंत पोलिसांना अल्टिमेटम देण्यात आला.

**कोण आहेत प्रतिवादी?**

गोकुळदास श्रीरामजी राऊत (अध्यक्ष), राजेश प्रभाकरराव देशमुख (मुख्य कार्यकारी अधिकारी) रामदास शेषराव कडू, राजेश विश्रामजी गाडे, अजयानंद सच्चिदानंद पवार (सर्व संचालक) व इतर, शुभांगी ज्ञानेश्वर ढवळे, अशोक दगडूजी लुनावत (भरती प्रक्रियेमध्ये ऑनलाईन परीक्षा घेणारी यंत्रणा)

# विद्यापीठाने लागू केले सरसकट 'कॅरी ऑन'

## एनएसयुआयच्या मागणीला यश विद्यार्थ्यांना मिळाला मोठा दिलासा



**विदर्भ प्रजासत्ताक दि.८अमरावती**

सरसकट सर्व विद्यार्थ्यांना कॅरी ऑन लागू करण्याच्या मागणीसाठी एनएसयुआयसह विविध विद्यार्थी संघटनांनी विद्यापीठात आंदोलन केले होतेय त्यांच्या या मागणीला यश मिळाले असून विद्यापीठाने आता सरसकट कॅरी ऑन लागू केले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.

विद्यापीठात मागील काही दिवसांपासून कॅरीऑन धोरणाबाबतचा अन्यायकारक निर्णय हे विद्यार्थी आणि पालक यांच्यातील चर्चेचे केंद्रबिंदू ठरले होते. इंजिनिअरिंग, आर्ट्स, सायन्स, कॉमर्स यांसारख्या अनेक शाखांना कॅरीऑन दिला गेला असताना, (कायदा) व (फार्मसी) शाखांतील विद्यार्थ्यांना त्यातून वगळण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर एसएसयुआय तसेच इतर विद्यार्थी संघटनांनी विद्यापीठ प्रशासनाकडे वेळोवेळी निवेदने दिली, आंदोलनाची चेतावणी दिली आणि हा दुजाभाव त्वरित थांबवण्याची जोरदार मागणी केली. संकटमुक्त विद्यार्थी हितासाठीच्या या सातत्यपूर्ण संघर्षानंतर अखेर विद्यापीठ प्रशासनाने लॉ आणि फॉर्मसी शाखांसह सर्व शाखांना सरसकट कॅरीऑन लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय अधिकृतपणे विद्यापीठाकडून घोषित करण्यात आला. सर्व शाखांतील विद्यार्थ्यांना समान संधी मिळावी. शैक्षणिक नुकसान व एक वर्ष वाया जाण्याचा धोका टाळावा. मागील परीक्षांमध्ये थोडक्याच विषयांमध्ये नापास झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील वर्षात प्रवेश मिळावा, या मागण्याबाबत विद्यार्थी प्रयत्नरत होते.एनएसयुआय अमरावती शहराध्यक्ष संकेत साहू यांनी सांगितले की, 'हाविद्यार्थ्यांच्या संघटित आवाजाचा विजय आहे. आम्ही यापुढेही विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी राहू. विद्यापीठच्या या निर्णयामुळे शेकडो विद्यार्थ्यांचे एक वर्ष वाचणार असून, विद्यार्थी वर्गात समाधानाचे वातावरण आहे. लढतयावेळेस अमरावती विधानसभा युवक काँग्रेस अध्यक्ष वैभव देशमुख, जिल्हा औद्योगिक सेल अध्यक्ष काँग्रेस युवक काँग्रेस प्रदेश सचिव समीर जवंजाळ, एनएसयुआय अमरावती शहराध्यक्ष संकेत साहू, युवा काँग्रेस जिल्हाध्यक्ष निलेश गुहे, एनएसयुआय जिल्हा अध्यक्ष संकेत कुलट, आकाश गेडाम, ओम कुबडे, शुभम बांबल, प्रियल मोहोड, वेदांत केणे, श्रेयस धर्माळे, अमेय देशमुख, स्वराज पोटे तसेच विद्यार्थी संघटनेचे प्रतिनिधी निखिल ठाकरे, समर्थ डावरे, ऋषिकेश टवकर, अथर्व चुनाडे, संकेत आळसपुरे, सार्थक याउल आदी उपस्थित होते.

# अमरावती-परतवाडा मार्गावरील अपुऱ्या दुरुस्तीवरून संताप

## १५ ऑगस्टला आंदोलनाचा इशारा; पूर्णानगरचे उपसरपंच उमेश महिंगे यांची प्रशासनाला थेट चेतावणी



**विदर्भ प्रजासत्ताक दि.८ वलगाव**

अमरावती ते धारणी मार्ग हा अमरावती जिल्ह्याचा मध्यप्रदेशाशी जोडणारा एक महत्त्वाचा राष्ट्रीय स्तरावरील दळणवळणाचा मार्ग असून, वलगाव ते आसेगावदरम्यानच्या रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. मोठमोठे खड्डे, निकृष्ट डांबरीकरण आणि अपूर्ण दुरुस्ती यामुळे हा मार्ग 'अपघातांचे माहेरघर ठरत आहे; मात्र याकडे प्रशासनाचे हेतूपुरस्सर दुर्लक्ष होत असल्याचा आरोप पूर्णानगरचे उपसरपंच उमेश महिंगे यांनी केला आहे.

उमेश महिंगे यांनी गेल्या दोन वर्षापासून सार्वजनिक बांधकाम विभागाशी सतत पत्रव्यवहार करून या रस्त्याच्या दुरवस्थेबाबत तक्रारी केल्या. काही वेळा तात्पुरते खडी दगड टाकून खड्डे बुजवले गेले, पण दर्जेदार व कायमस्वरूपी आजवर झालेले नाही. यामुळे रस्त्यावर अपघातांचे प्रमाण वाढले असून, आष्टी, वलगाव, अमरावती व आसेगाव ग्रामीण रुग्णालयांमध्ये अपघातांची नोंद वाढली आहे.गुरुवारी महिंगे यांनी अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती यांची प्रत्यक्ष भेट घेऊन रस्त्याच्या काम त्विरित दुरुस्तीसाठी निवेदन दिले त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, हा रस्ता सात दिवसांत दुरुस्त न झाल्यास १५ ऑगस्ट रोजी लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास संपूर्ण जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाची राहील.

गावकऱ्यांचा संयम सुटत चालला असून, १५ ऑगस्टच्या आंदोलनाकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे. रस्त्याच्या निकृष्ट अवस्थेचा कायमस्वरूपी तोडगा निघतो का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# हातात तलवार घेऊन दहशत पसरविणारा गजाआड




**विदर्भ प्रजासत्ताक दि.८अमरावती**

हातात तलवार घेऊन दहशतपसरविणाऱ्या आरोपीस पोलिसांनी गजाआड केले आहे ही कारवाई गुन्हेशाखा युनिट क्रमांक दोन च्या पथकाने केली आहे.

आरोपीने हातात तलवार व चाकू घेऊन सोशल मीडियावर पोस्ट वायरल केल्याची गुप्त माहिती गुन्हेशाखा युनिट क्रमांक २ ला मिळाली होती. त्यानुसार सोशल मीडियावरील त्या आरोपीचा शोध घेऊन गुन्हेशाखा युनिट क्रमांक २ ने आरोपी संतोष चतुर्भुज बजाज (३८) रा. कपिलवस्तूनगर अमरावती यास त्याच्या घरातून जेरबंद केले आहे.सोशल मीडियावर एका फोटोत हातात तलवार घेऊन आहे, तर दुसऱ्या फोटोवर हातात चाकू घेऊन दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केल्यामुळे पोलिसांनी आरोपी संतोष बजाज याला ताब्यात घेतले आहे. आरोपीकडून तलवार व चाकू जप्त करून गाडगेनगर पोलिसात आरोपी विरुद्ध कलम ४,२५ आर्म व सहकलम १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई पोलिस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त गणेश शिंदे, रमेश धुमाळ, शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हेशाखा युनिट क्रमांक २ चे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली सपोनी महेश इंगोले, अमोल कडू, महेंद्रसिंग येवतीकर, गजानन ढेवले,आस्तिक देशमुख, मनोज ठोसर, जहीर शेख, संग्राम भोजने, अतुल संभे, विशाल वाकपांजर, योगेश पवार, राजीव रायलीवाले, राहुल ढेंगेकार, चेतन शर्मा यांच्या पथकाने केली आहे.

# तात्पुरता शेणखत मुक्त रस्ता जनावरे मात्र अजूनही रोडवरच



**विदर्भ प्रजासत्ताक दि.८दर्यापूर**

दर्यापूर नगरपरिषदेच्या हद्दीत श्री संत गाडगे महाराज बालगृह शेजारी असलेला सार्वजनिक सिमेंट काँक्रीट रस्ता अनेक दिवसांपासून शेणखताने माखलेला होता. या रस्त्यावरील अस्वच्छतेबाबत स्थानिक नागरिकांनी नगरपरिषदेकडे तोंडी तक्रार केली होती. तसेच बालगृहातील माजी विद्यार्थ्यांनी १४ ऑगस्ट रोजी आमरण उपोषण करण्याची घोषणा केली होती.

पावसाळा अद्याप संपला नसला तरी पावसाने काही दिवस विश्रांती घेतल्याने नगरपरिषदेकडून हा रस्ता स्वच्छ करून तात्पुरता शेणखत मुक्त करण्यात आला. मात्र ही केवळ तात्पुरती उपाययोजना असल्याचे स्पष्ट होत आहे. स्थानिकांचा आरोप आहे की, हा रस्ता सार्वजनिक ये-जा करण्यासाठी असतानाही येथे नियमितपणे म्हशी, गायी आणि त्यांच्या वासरांना बांधले जाते. त्यामुळे रस्त्यावर पुन्हा शेणखत साचण्याची समस्या निर्माण झाली आहे. वारंवार तक्रारी करूनही नगरपरिषदेने या समस्येकडे कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी लक्ष दिलेले नाही.

घर कुठे, म्हैस कुठे आणि शेणखत कुठे - याचा काहीच तालमेल नसल्यामुळे ही परिस्थिती उद्भवली आहे, अशी प्रतिक्रिया बालगृह प्रशासनाने दिली. नागरिकांचा प्रश्न असा आहे की, जसा रस्ता तात्पुरता शेणखत मुक्त झाला, तसाच तो जनावरांपासून मुक्त कधी होणार?असा प्रश्न अजूनही अनुत्तरित आहे.

# शेवटच्या घटकाला न्याय मिळण्यासाठी प्रयत्न करावेत - आमदार संजय खोडके



**विदर्भ प्रजासत्ताक दि. ८ अमरावती**

मेळघाटमध्ये काम करणे आजही आव्हानात्मक आहे. निती आयोगाच्या सहकार्याने आकांक्षित भागाच्या विकासासाठी महत्वपूर्ण कार्य करण्यात आले आहे. त्यामुळे प्रशासनाने शेवटच्या घटकाला न्याय मिळण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन आमदार संजय खोडके यांनी केले.

जिल्हा नियोजन सभागृहात संपूर्णत: अभियान सन्मान सोहळा पार पडला. यावेळी आमदार प्रविण तायडे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश आसोले, विभागीय महिला व बालविकास अधिकारी विलास मसराळे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते आदी उपस्थित होते.

आमदार श्री. खोडके यांनी, जिल्ह्याच्या विकासासाठी प्रत्येक नागरिकापर्यंत योजना पोहोचविण्यात यावी. सर्व नागरिकांपर्यंत लाभ पोहोचावा यासाठी लाभार्थ्यांपर्यंत पोहोचावे. या केलेल्या कामाचे मुल्यमापन झाल्याने अधिकारी, कर्मचारी यांचा सत्कार करण्यात येत आहे. शासकीय योजनांची मदत केल्याने नागरिकांचे दारिद्र्य कमी करण्यास मदत होणार आहे. मागासलेल्या भागांमध्ये शाळा सुटल्याने बालविवाह होत आहे. त्यामुळे शिक्षण विभागाने या क्षेत्रावर लक्ष ठेवून वेळीच कार्यवाही करावी. शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी कृषी विभागाने नवीन योजना हाती घ्याव्यात. शेतकऱ्यांना लाभ देण्यासाठी एकाच ठिकाणी विक्रीची व्यवस्था उभारल्यास फायदा होऊ शकेल, असे सांगितले.

आमदार श्री. तायडे यांनी, समाजाच्या विकासासाठी सर्वांनी एकत्रित कार्य करावे. समस्या घेऊन आलेल्या नागरिकांचे समाधान झाल्यास लोकप्रतिनिधींकडे येणाऱ्या तक्रारी होईल. सक्रीयपणे समस्यांवर काम केल्यास नागरिकांचे समाधान होण्यास मदत होईल, असे सांगितले.

जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी आकांक्षित तालुक्यात आरोग्य, माती परिक्षण, दळणवळण या क्षेत्रात उत्कृष्ट कार्य झाले आहे. केवळ उद्दीष्ट गाठण्यापेक्षा परिणाम होईल, असे कार्य होणे आवश्यक आहे. मेळघाटातील बालमृत्यू नियंत्रणात असला तरी मातामृत्यू रोखण्यासाठी अल्पवयात होणारे विवाह रोखणे गरजेचे आहे. कमी वयात गर्भधारणा राहू नये, तसेच दोन मुलांमध्ये अंतर राखण्याबाबत जनजागृती करावी. येत्या काळात या सर्व क्षेत्रात कार्य करून जिल्ह्याचा विकास घडवून आणण्यात येईल.

मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती महापात्र यांनी, मेळघाटात कर्मचारी विपरीत परिस्थितीत कार्य करीत असल्याची जाणीव आहे. प्रशासन ही जनतेची सेवा असल्याने प्रत्येकाने प्रामाणिकपणे कार्य करावे. गरजू नागरिकांपर्यंत पोहोचून केवळ आपला परिसर बदलण्यासाठी प्रयत्न करावा, असे आवाहन केले.

यावेळी धारणी आणि चिखलदरा तालुक्यातील आरोग्य विभाग, तहसिल कार्यालय, पंचायत समिती, कृषी विभाग, जिल्हा परिषद, जिल्हा नियोजन विभाग, तालुका कृषी कार्यालय, बाल विकास कार्यालय, राष्ट्रीय जीवनोन्नती अभियान, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, गटशिक्षणाधिकारी यांचा प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. चिखलदऱ्याचे गटविकास अधिकारी विनोद खेडकर यांनी आभार मानले.

# विद्यार्थ्यांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्स शिकावे, सोशल मीडियावरून भडकवणाऱ्यांपासून सावध राहावे : आ.रोहित पवार



**विदर्भ प्रजासत्ताक दि.८अमरावती**

तंत्रज्ञानातील बदल समजून घेण्याचे व त्यानुसार कौशल्य विकसित करण्याचे आवाहन केले. सट्टा बाजारात कुणी पैसे कमावत नसतो, मोबाईलवर रमी किंवा ऑनलाइन गेम खेळत असेल तर सतर्क राहा, असे मत आ.रोहित पवार यांनी युवकांना मागदर्शन करतांना स्पष्ट केले.

अमरावती राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षयांच्या वतीने जिल्हाध्यक्ष प्रा.डॉ. हेमंत देशमुख यांच्या पुढाकाराने सांस्कृतिक भवन येथे शुक्रवारी भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या रोजगार मेळाव्याला प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे,आ.रोहित पवार प्रामुख्याने उपस्थित होते.रोहित पवार यांनी पुढे सांगितले की, आर्टिफिशियल इंटेलिजन्स क्षेत्रात जलदगतीने बदल होत असून, विद्यार्थी व तरुणांनी ते शिकून आपली स्पर्धात्मकता वाढवावी. नोकरीच्या संधींबाबत बोलताना त्यांनी स्थानिक तरुणांना प्राधान्य देण्याची मागणी केली. नोकरी भूमिपुत्रांना मिळावी ही आमची मागणी आहे. आज शिक्षण व्यवस्थेत प्रचंड खर्च होत असला तरी पालक अनेकदा आपल्या स्वप्नांचा त्याग करून मुलांना शिक्षण देतात. मात्र, नोकरी देण्याचे काम सरकारचे आहे. सत्तेत असलेल्यांनी हे कर्तव्य पार पाडले पाहिजे, तर विरोधक म्हणून आम्ही त्यासाठी सातत्याने पाठपुरावा करू, असे ते म्हणाले.गुजरातमध्ये उद्योग स्थलांतराबाबत त्यांनी चिंता व्यक्त केली. आज अनेक कंपन्या गुजरातकडे वळत आहेत. शेतकरी अडचणीत आहे, उद्योजकांना कमी दरात वीज द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.सोशल मीडियावरील राजकीय वातावरणावर भाष्य करताना त्यांनी विद्यार्थ्यांना सावधानतेचा सल्ला दिला. सोशल मीडियाच्या माध्यमातून भडकवण्याचे प्रकार होत आहेत. विद्यार्थ्यांनी आपला राजकीय फायदा कुणालाही घेऊ देऊ नये, असे त्यांनी ठामपणे सांगितले.या रोजगार मेळाव्यात विविध क्षेत्रातील कंपन्यांनी सहभाग घेतला असून, शेकडो तरुणांनी नोकरीसाठी अर्ज केले होते.

# अकोल्यातील शिवभक्तांवर मध्य प्रदेशमध्ये काळाचा घाला

## दोन कावडधारी शिवभक्तांचा दुर्दैवी मृत्यू : पवित्र गंगाजल घेऊन परतणाऱ्या कावड यात्रेमध्ये रेतीचा अनियंत्रित ट्रक शिरला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८अकोला**



अकोला जिल्ह्याच्या पातूर येथील शिवभक्तांवर मध्य प्रदेशमध्ये काळाने घाला घातला. उत्तर प्रदेशमधील वाराणसी येथून पवित्र गंगाजल घेऊन परतणाऱ्या कावड यात्रेमध्ये रेतीचा अनियंत्रित ट्रक शिरला. या ट्रकची धडक लागल्याने कावड यात्रेतील ट्रॅक्टर ट्रॉली उलटली. त्याखाली दबून दोन शिवभक्तांचा मृत्यू झाला तर ११ जण जखमी झाले आहेत. ही दुर्दैवी घटना मध्य प्रदेशातील सिवनी येथे मध्यरात्रीच्या सुमारास घडली. या घटनेमुळे अकोला जिल्ह्यात हळहळ व्यक्त केले जात असून शोककळा पसरली आहे.

श्रावण महिना सुरू असल्याने देशभरात विविध ठिकाणी कावड यात्रा काढली जाते. कावड यात्रा काढण्याची मोठी परंपरा आहे. यामध्ये पवित्र जलाने जलाभिषेक केला जातो. दरम्यान, कावड यात्रेतून पवित्र गंगा नदीचे जल घेऊन येणाऱ्या जिल्ह्यातील शिवभक्तांचा मध्यप्रदेशमध्ये मोठा अपघात झाला. जिल्ह्यातील पातूर येथील जय तपे हनुमान व्यायाम शाळेच्यावतीने कावड यात्रा काढण्यात आली होती. काशी विश्वनाथ येथून गंगाजल घेऊन ही कावड यात्रा परतीच्या मार्गावर असताना दुर्दैवी घटना घडली.

मध्य प्रदेशमधील सिवनी येथे कावडधारी शिवभक्तांनी रात्रीचे जेवण घेतले. त्यानंतर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वरून ते महाराष्ट्राच्या दिशेने निघाले होते. यावेळी मागून येणाऱ्या रेतीचा अनियंत्रित ट्रक कावड यात्रेमध्ये शिरला. या ट्रकने कावड यात्रेतील ट्रॅक्टरला जोरदार धडक दिली. या धडकेमुळे ट्रॅक्टर व ट्रॉली अनियंत्रित होऊन कावडधाऱ्यांच्या अंगावर कोसळली. त्यामुळे त्याखाली दबून दोन कावडधारी शिवभक्तांचा मृत्यू झाला, तर ११ जण जखमी झाले आहेत. बंडू पांडुरंग बंड आणि अविनाश पोहरे अशी मृतांची नावे आहेत. या अपघाताची माहिती मिळताच स्थानिक प्रशासन व पोलिसांनी घटनास्थळावर धाव घेतली. पोलिसांनी जखमींना उपचारार्थ तत्काळ स्थानिक जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले.

जखमींपैकी देखील काहींची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती वैद्यकीय सुत्रांनी दिली. या अपघातानंतर ट्रक चालक घटनास्थळावरून फरार झाला. मध्य प्रदेश पोलिसांनी घटनेचा पंचनामा केला असून ट्रकचालकाचा शोध घेतला जात आहे. धार्मिक प्रथेनुसार काढलेल्या कावड यात्रेतील शिवभक्तांवर काळाने झडप घातल्याने अकोला जिल्ह्यातील पातूर येथे शोक व्यक्त केला जात आहे

# नागपूर-पुणे वंदे भारत एक्सप्रेसच्या उद्घाटनाच्या दिवशी प्रवास मोफत



**विदर्भ प्रजासत्ताक दि.८नागपूर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी अजनी ते पुणे, बंगळुरू ते बेळगाव आणि अमृतसर ते वैष्णोदेवी दरम्यान वंदे भारत एक्सप्रेसला १० ऑगस्टला हिरवा झेंडा दाखवणार आहेत. नागपुरातून सध्या सिंकदराबाद, बिलासपूर आणि इंदूर अशा तीन वंदे भारत एक्सप्रेस सुरू आहेत. अजनी-पुणे ही चौवथी वंदे भारत ठरणार आहे. अजनी-पुणे वंदे भारत एक्सप्रेसचा उदघाटन सोहळा रविवारी नागपूर मध्यवर्ती रेल्वे स्थानकावर आयोजित करण्यात आला आहे. या उदघाटनीय गाडीतून विविध सामाजिक, सांस्कृतिक संस्थांचे पदाधिकारी, शाळकरी मुले, एनसीसी कॅडेटस, राजकीय नेते, पदाधिकारी यांना प्रवास घडवला जाणार आहे. या गाडीसाठी रेल्वे तिकीट उपलब्ध नाहीत. प्रवासासाठी विशेष पास तयार करण्यात आला असून पासधारकांना मोफत प्रवास राहणार आहे. दरम्यान, शिक्षण आणि नोकरीसाठी विदर्भातून पुण्याला जाणाऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. ही गाडी नागपूरहून सोमवार आणि पुण्याहून मंगळवार वगळता आठवडाभर धावणार आहे.

# नवनीत राणा यांना धमकी प्रकरणी भाजप व युवा स्वाभिमान पक्षाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८अमरावती**



माजी खासदार नवनीत राणा यांना 'इसा भाई' या इंस्टाग्राम युजरकडून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली असून, त्यासोबतच अश्लील आणि अपमानास्पद भाषा वापरण्यात आली होती. या घटनेविरोधात भाजप व युवा स्वाभिमान पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी आज जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन संबंधितांवर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे. यावेळी मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना भाजप आमदार प्रवीण तायडे म्हणाले, अशा व्यक्तींना आम्हीसुद्धा घरात शिरून उत्तर देऊ शकतो, मात्र त्यामुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे प्रशासनाने तत्काळ कारवाई करावी.तसेच, सोशल मीडियावर महिलांविरोधात अश्लील भाषा वापरणे निंदनीय असल्याचेही त्यांनी नमूद केले. या घटनेने पुन्हा एकदा सामाजिक माध्यमांवरील सुरक्षिततेचा आणि कायद्याच्या अंमलबजावणीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.यावेळी भाजप शहर अध्यक्ष डॉ.नितीन धांडे, आ.प्रवीण तायडे सुनिल काळे,बादल कुलकर्णी, कौशिक अग्रवाल,ललीत समदुरकर, मिलींद बांबल,जयंत डेहनकर, गजानन देशमुख,सचिन डाके,धनंजय भुजाडे,संजय आठवले, सुखदेव तरडेजा, विनाद गुहे, तुषार वानखडे निकुंज राजा,गंगा खारकर,जया माहोरेशितल वाघमारे,राधा कुरिल,मेधा हिंगासपुरेतृप्ती वाढ,भारती पाटील, भाग्यश्री देशमुख प्रतिक इंगळे,शाम पाध्य,मंगेश खांडे, कुसुम साहु,उमेश निलगिर,किशोर जाधव सह नेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# सायबर फ्रॉड करणारी आंतरराज्यीय टोळी गुजरात येथून जेरबंद

## टास्कद्वारे नफ्याचे आमिष देऊन लाखोंची फसवणूक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८अमरावती**



टेलिग्राम सोशल मीडिया अप्लीकेशनवर ऑनलाईन जॉब देण्याचे आमिष देऊन पैसे लुटणाऱ्या आरोपींची आंतरराज्यीय टोळी अमरावती ग्रामीणच्या सायबर पोलिसांनी गुजरात येथून जेरबंद केली आहे.

अंकित भगवंत बोरिया (२७) रा. उद्योगनगर जि. जामनगर गुजरात, दर्शन बलवंधाई रावल (३४) रा. रणजीत सागर रोड, जि. जामनगर गुजरात, गुरवीनसिंग मनमोहनसिंग खोकर (२३) रा. सुभाष चौक रातनवाडा जि. जोधपूर राजस्थान व भावेश इंद्रा गिरी (२१) रा. हिंदुस्थान गवारगेमजवळ जोधपूर, राजस्थान अशी जेरबंद करण्यात आलेल्या टोळीतील आरोपींची नावे आहेत. १४ जुलै २०२५ रोजी अमरावती ग्रामीण सायबर पोलिसस्टेशनला तक्रार प्राप्त झाली होती की, आरोपींनी ऑनलाईन जॉब देण्याचे आमिष देऊन फिर्यादीस १ टास्क दिला व त्यामध्ये तक्रारकर्त्याला ९७० रुपये प्रॉफीट दाखवून ते त्यांना दिले व त्यांना सांगितले की, आम्ही तुम्हाला असेच मोठ्या रकमेचे टास्क देऊ, असे आमिष दिल्यामुळे फिर्यादीने वेगवेगळ्या अकाऊंटवर ऑनलाईन पध्दतीने २४ जून २०२५ पर्यंत एकूण २ लाख ५६ हजार ४०३ रुपये पाठविले, परंतु फिर्यादीस परतावा मिळाला नाही. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच सायबर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुष्ट कलम ३१६ (२),३१८ (४), सहकलम ६६ ड. आयटी ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला होता.गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता पोलिस अधीक्षकांनी या गुन्ह्याचा तपास गांभीर्यानेकरण्याचे सायबर पोलिसांना आदेश दिले होते. सदर गुन्हा क्लिस्ट स्वरुपाचा असल्याने तसेच आरोपीने जास्त प्रमाणात बँक अकाऊंट वापरले असल्याने त्यांचे डिटेल प्राप्त करून पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण केले व आरोपीबाबत संपूर्ण माहिती प्राप्त केली. गुन्ह्याचा तपास गुजरात व राजस्थान राज्यात करून यामध्ये ४ आरोपीस जोधपूर (राजस्थान) जामनगर गुजरात येथून अटके केली असून, त्यामध्ये अजूनही आरोपी असल्याची शक्यता पोलिसांनी वर्तविली आहे.तसेच या सायबर गुन्ह्याचा संबंध विदेशात सुध्दा असण्याची शक्यता पोलिसांनी वर्तविली आहे. या गुन्ह्यात आरोपीकडून मोबाईल व क्रिप्टो करेंसी अंदाजे ४ लाख रुपये असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

### यांनी केली कारवाई

ही कारवाई पोलिस अधीक्षक विशाल आनंद, अप्पर पोलिस अधीक्षक पंकज कुमावत, स्थानिक गुन्हेशाखेचे सहा. पोलिस निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक गोपाल उपाध्याय, सहा. पोलिस निरीक्षक विलासकुमार सानप, पोलिस उपनिरीक्षक सुनील बनसोड, हवालदार प्रवीण वानखडे, अजित राठोड, सागर धापड, अश्वीन यादव, सरिता चौधरी, रोशन लकडे, संदीप जुगनाके, पवन ढोक, पवन जाधव तसेच अंजनगाव पोलिसस्टेशनचे पोलिस उपनिरीक्षक अनिल सावळे व पो. कॉ. युवराज सोळंके यांनी केली

# मनपात २० ऑगस्टपासून कामबंद

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८अमरावती**



मनपा आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी, कर्मचारी, सफाई कर्मचारी व सेवानिवृत्ती कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांवर मनपा प्रशासनाने अद्याप कारवाई केली नसल्यामुळे मनपा कर्मचारी, कामगार संघाद्वारे बुधवार, २० ऑगस्टपासून बेमुदत आंदेलनाचा इशारा देण्यात आला आहे. सातवा वेतन आयोग लागू करणे, महागाई भत्त्यात वाढ, घर भाडे भत्त्यात २ टक्के वाढीची थकबाकी या मागण्या काही महिन्यांपासून प्रलंबित असल्याने नाईलाजाने संघटनेला कामबंद आंदोलनाचे हत्यार उपसावे लागत असल्याचे सरचिटणीस प्रल्हाद कोतवाल यांनी कळवले आहे.

# मांगीलाल प्लॉट येथे वयोवृद्ध महिलाच्या घरात २.३७ लाखांची चोरी; तिघे आरोपी गजाआड

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८अमरावती**



मांगीलाल प्लॉट परिसरातील एका वयोवृद्ध महिलाच्या बंद घरात तब्बल २ लाख ३७ हजारांचा ऐवज चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. कंदा जयकीसन कासट (वय ७२) या महिला १० जुलै रोजी मुलीकडे पुण्यास गेल्या असता, अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून सोनं, रोख रक्कम, टीव्ही, मोबाईल व पितळी भांडी असा मौल्यवान माल लंपास केला.

२३ जुलै रोजी शेजाऱ्यांकडून चोरीची माहिती मिळाल्यानंतर ३ ऑगस्ट रोजी अमरावतीला परतलेल्या कासट यांनी सिटी कोतवाली पोलिसात तक्रार दाखल केली. तक्रारीनंतर पोलीसांनी तातडीने तपास सुरू करत मंथन वाकोडे, ऋतिक उर्फ मेहरा चव्हाण आणि आकाश उर्फ कोब्रा कंगाले यांना ताब्यात घेतले. चौकशीत तिघांनीही गुन्ह्याची कबुली दिली.तपासादरम्यान १ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून उर्वरित मालाच्या शोधासाठी प्रयत्न सुरू आहेत. ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. मनोहर कोटनाके व त्यांच्या पथकाने केली.

# बहीण-भावाच्या बंधनाला महागाईची झळ; राख्या खरेदीसाठी ऑनलाइनचे आकर्षण

## राखीच्या दरात २० ते २५ टक्के वाढ, बाजारपेठा सजल्या

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८अमरावती**

श्रावण महिना लागताच सणांची रेल-चेल सुरू होते. बहीण-भावाच्या प्रेमळ नात्याचा ऋणानुबंध जपणारा सण म्हणजे रक्षाबंधन.मात्र यंदा भावा-बहिणीच्या प्रेमाचे प्रतीक असणारी राखी यंदा २० ते २५ टक्क्यांनी महागली असल्याचे चित्र दिसून येत आहे.रक्षाबंधना निमित्त बाजारपेठ गर्दीने फुलून गेली आहे.भाऊरायाच्या पसंतीस उतरेल अशी राखी घेण्यासाठी महिलांनी बाजारात गर्दी केली आहे तर दुसरीकडे आपल्या बहिणीसाठी भेटवस्तू खरेदी करताना युवावर्ग दिसत आहे.अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या रक्षाबंधनानिमित्त विविध बाजारपेठेत आकर्षक राख्या विक्रीस दाखल झाल्या आहेत.बहिणींसाठी पवित्र मानल्या जाणाऱ्या रक्षाबंधनाच्या सणावर यंदा महागाईचे सावट दिसून येत आहे.सर्वच क्षेत्रांत वाढलेल्या महागाईचा परिणाम आता राख्यांच्या किमतीवरही दिसून येत असल्याचे चित्र बाजारपेठेत आहे. रक्षाबंधनाचा सण ९ ऑगस्ट रोजी आहे.भावांना राखी पोस्टाने पाठविण्यासाठी बहिणींची लगबग सुरू आहे.दरम्यान गतवर्षीच्या तुलनेत यंदा राख्यांच्या दरात वाढ झाल्याचे दिसून येते.बाजारात सर्वच प्रकारच्या राख्या महाग असल्याचे दिसून येत आहे.पूर्वी देवराख्या पाच रुपये डझनप्रमाणे सहज उपलब्ध होत असत.आता या राख्यांची किंमत सात ते आठ रुपये झाली आहे.बाजारात ५ रुपयांपासून ते ३०० रुपयांपर्यंत राख्या उपलब्ध आहेत. यात ५० ते १०० रुपयांच्या राख्यांची अधिक विक्री होत आहे.यंदाराख्या खरेदीसाठी ऑनलाइनचे आकर्षणाचा प्रभाव दिसून येत आहे. बाजारात



आकर्षक ऑनलाइन राख्या उपलब्ध आहेत. त्याचवेळी बदलत्या ट्रेंड नुसार राख्या खरेदीसाठी विविध ऑनलाइन साइटवरही राख्या उपलब्ध आहेत. यामध्ये चांदीच्या राख्यांसोबतच क्रेलिक व लाकूड या प्रकारातील राख्यांनाही मोठी मागणी आहे. ऑनलाइन राख्या खरेदी करताना भरघोस सूट मिळत असल्यामुळे काही बहिणींची या राख्यांना पसंती असल्याचे दिसून येते.* सद्यस्थितीत लहान राख्यांना ग्राहकांची अधिक पसंती असल्याची प्रचिती दिसून येत आहे.बाजारात लहान राख्यांना ग्राहकांची अधिक पसंती मिळत आहे.राखीसाठी लागणारे रेशीम, कुंदन तसेच मजुरीत वाढ झाल्याने गतवर्षीच्या तुलनेत यंदा राख्यांच्या भावात १० टक्क्यांची वाढ झाली असे राखी विक्रेत्यांनी सांगितले.* बाजारात कुंदन वर्क, साध्या राख्यांना मागणी असल्याने विक्रेत्यांनी अधिकाधिक राख्या उपलब्ध करून दिल्या आहेत.चिमुकल्यांसाठी लायटिंग राख्या, छोटा भीम,डोरेमॉन,मोटू पतलू,श्री गणेशा,श्रीकृष्ण अशा राख्या बाजारात विक्रीस आल्या आहेत. कुंदन वर्क आणि साध्या राख्यांना जास्त मागणी आहे.लायटिंग, लाकडी,पपेट,कडा राखीसह पारंपरिक देव राखी अशा विविध प्रकारच्या राख्या बाजारात विक्रीस आल्या आहेत.